CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. १६ ऑक्टोबर २०२२ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १९ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## आजपासून तीन दिवस पावसाचा जोर पुन्हा वाढणार

मुंबई :गेल्या दोनचार दिवसांपासून परतीच्या पावसाने राज्यात पार दाणादाण उडवली आहे. शेतमालाचे अतोनात नुकसान झालं तर शहरवासीयांनाही याचा मोठा फटका बसल्याचे पाहायला मिळत आहे.

१६ ऑक्टोबरला कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भातील सर्वच जिल्ह्यात तर मराठवाड्यातील काही जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवली आहे. बंगालच्या उपसागरात खालच्या उष्णकटिबंधीय क्षेत्रात नवीन चक्री दाब केंद्र तयार होत आहे. दुसरीकडे, अरबी समुद्रातही कर्नाटक आणि कोकण किनारपट्टीजवळील खालच्या उष्णकटिबंधीय भागात नवीन चक्रीवादळ दाब केंद्र तयार होत आहे.

या दोन्ही परिस्थितीमुळे पुढील आठवड्यात देशातील अनेक राज्यांमध्ये पाऊस पडण्याची शक्यता आयएमडीने व्यक्त केली आहे. य

१६ ऑक्टोबरला कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भातील सर्वच जिल्ह्यात तर मराठवाड्यातील काही जिल्ह्यात, १७ ऑक्टोबरला कोकण, मध्य महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यांत आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. १८ ऑक्टोबर रोजी कोकण, मध्य महाराष्ट्रासह मराठवाड्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पाऊस होईल, असा अंदाज आहे.

# मुंढेंचे इंजेक्शन, आरोग्य उपसंचालकांचे सोलापुरात इन्स्पेक्शन

## तपासणी राहिली बाजूला, फटाक्यांची माळ लावली स्वागताला

सुराज्य/सोलापूर

**कडक शिस्त, कायदेशीर काम, बेकायदा वागणाऱ्यांना लगाम या त्रिसूत्रीवर काम करणारे अधिकारी अशी ओळख असणारे तुकाराम मुंढे हे राज्याच्या आरोग्य आयुक्तपदी रुजू होताच संपूर्ण राज्यातील आरोग्य यंत्रणा अॅलर्ट झाली आहे. 'आरोग्य यंत्रणा सुधारलीच पाहिजे' असे इंजेक्शन त्यांनी पहिल्याच दिवशी दिल्यानंतर सलाईनवरील यंत्रणा सदृढ बनून कामाला लागली आहे. याचाच धसका घेऊन अचानक सोलापूर दौऱ्यावर आलेले उपसंचालक इन्स्पेक्शन करायला अक्कलकोटला गेले. त्याठिकाणी त्यांची तपासणी राहिली बाजूला आणि फटाक्यांची माळ लावली स्वागताला असे चित्र समोर आले आहे.**

जनतेला आरोग्य सुविधा सहजपणे कशा पद्धतीने उपलब्ध होतील याकडे मुंढे यांनी पहिल्या दिवसापासून लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे आरोग्य खात्यातील वरिष्ठ डॉक्टर सरकारी रुग्णालयात रात्री-अपरात्री सरप्राईज भेटी देत रुग्णांच्या समस्या जाणून घेत आहेत. सार्वजनिक आरोग्य सेवा पुणे मंडळ येथील आरोग्य उपसंचालक डॉ. संजोग कदम हे शुक्रवारी रात्री अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाला भेट देण्यासाठी आले होते. पण अक्कलकोट येथील ग्रामीण रुग्णालय प्रशासनाने हारतुऱ्यांनी व वाजतगाजत, फटाक्यांच्या माळा लावून डॉ. संजोग कदम यांचे स्वागत केले. त्यामुळे सरप्राईज भेट बाजूला राहिली आणि उपसंचालक डॉ. संजोग कदम यांच्या जंगी स्वागताचा कार्यक्रमच पुढे आला.







### अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयात जंगी स्वागत

आरोग्य उपसंचालक डॉ. संजोग कदम हे अक्कलकोट येथील ग्रामीण रुग्णालयाला भेट देणार असल्याची माहिती मिळताच अक्कलकोटचा तात्पुरता पदभार सांभाळणारे डॉ.. अशोक राठोड हे त्यांची मूळ नियुक्ती असलेल्या मंद्रुप ग्रामीण रुग्णालय येथून अक्कलकोटकडे रवाना झाले. डॉ. संजोग कदम यांना खूष करण्यासाठी अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी फटाक्यांची माळ उडवली. तपासणीसाठी आलेले उपसंचालक डॉ. संजोग कदम स्वागत समारंभात रमून गेले.

### तीन डॉक्टरांनी दिले स्वत:हून राजीनामे

मुंढे हे पूर्वी सोलापूरला जिल्हाधिकारी होते. त्यामुळे त्यांच्या कामाचा धडाका सोलापूरच्या प्रशासनाला माहिती आहे. मुंढेंकडे हलगर्जीपणाला माफी नसल्याची जाणीव असल्यामुळे जिल्हा आरोग्य विभागातील तीन डॉक्टरांनी स्वत:हून राजीनामे देऊन बाजूला होणे पसंत केले आहे. त्यांची राजीनामे अद्याप स्वीकारले नसून त्यांचे मनपरिवर्तन करण्याचे काम सुरू असल्याची माहिती जिल्हा आरोग्याधिकारी डॉ.. शीतलकुमार जाधव यांनी दिली.

### प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांच्या बदलीचा निघाला आदेश

वर्षानुवर्षे आरोग्य विभागातील काही कर्मचारी मुख्यालयात म्हणजे सोलापुरी ठाण मांडून बसले होते. मात्र मुंढेंनी पदभार घेतल्यानंतर एनआरएचएममधील आरोग्य सेवकांनी त्यांच्या मूळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर राहण्याचा आदेश जिल्हा आरोग्याधिकाऱ्यांनी काढला. मुख्यालयात असे १३ कर्मचारी होते. त्यांना आता त्यांच्या मूळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावेच लागणार आहे. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांमध्ये चुळबुळ सुरू झाली आहे.




## कोंडी येथे ट्रकला धडकल्याने एक ठार

सुराज्य/सोलापूर : सोलापूर-वेगाने जाणारी दुचाकी रस्त्याच्या कडेला थांबलेला ट्रकला पाठीमागून धडकल्याने एक तरुण ठार तर एकजण जखमी झाला. हा अपघात सोलापूर ते पुणे महामार्गावरील कोंडीजवळ शनिवारी दुपारच्या सुमारास घडला. सोहेल सिराज बेगडे (वय २२) आणि समाधान शिवाजी धनवडे (वय २३ दोघे रा. तामलवाडी ता.तुळजापूर) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी सावळेश्वर टोलनाका कर्मचाऱ्यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्यापैकी सोहेल बेगडे हा उपचारापूर्वी मयत झाला. ते दोघे दुचाकी वरून मोहोळ ते सोलापूरच्या दिशेने निघाले होते. दुपारी ३ वाजेच्या सुमारास कोंडी येथील शिवशंकर हॉटेल जवळ एका ट्रकला पाठीमागून धडकल्याने हा अपघात घडला होता. याची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## एकोपा होताच पिता-पुत्रांची झाली गळाभेट...

### जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या शिष्टाईला यश

सुराज्य/सोलापूर

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर यांच्या पुढाकाराने संभावित पिता आणि पुत्र यांच्यातील वादाचे सामोपचाराने निराकरण करण्यात आले.विधी सेवाच्या मध्यस्थीने दुरावलेले पिता-पुत्र यांची गळाभेट झाल्यानंतर वातावरण भारावून गेले.

८५ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे दाखल पूर्व दावा सादर केला होता. याबाबत वाद मध्यस्थ जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव नरेंद्र जोशी यांच्याकडे वर्ग करण्यात आला होता. अर्जदार ज्येष्ठ नागरिकांचे सविस्तर म्हणणे ऐकून घेतल्यानंतर त्यांच्या मुलांना मध्यस्थी करिता नोटीस पाठवून बोलावण्यात आले. यास प्रतिसाद देत दोन्ही मुले मध्यस्थी करिता जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालयात उपस्थित झाले. १३ते ऑक्टोबर २०२२ रोजी मध्यस्थी बाबत सविस्तरपणे चार बैठका घेण्यात आल्या. या मध्यस्थींच्या प्रक्रियेदरम्यान मध्यस्थ यांनी पिता आणि पुत्र यांचे म्हणणे स्वतंत्ररीत्या आणि एकत्रितरीत्या ऐकून घेतले. त्यानंतर उभयता पिता व पुत्रांना समुपदेशन करत वाद मिटविण्याबाबत आवाहन केले. तसेच भविष्यात वादामुळे निर्माण होणाऱ्या बाबींची कल्पनाही दिली.

या बैठकीदरम्यान उभयता पिता व पुत्र यांना आपापसातील गैरसमज दूर होण्यासाठी मोकळा वेळ देण्यात आला. पिता पुत्रांनी सुद्धा एकमेकांबद्दल एकमेकांकडून असलेल्या अपेक्षा आणि आस्था-प्रेम आधी मोकळेपणाने व्यक्त केल्या. या मध्यस्थी प्रक्रियेसाठी ज्येष्ठ नागरिकांचे नातू, स्नुषा या सुद्धा उपस्थित होत्या. एकंदरीत उभयता पिता पुत्रांना वाद वाढविणे हे योग्य नसल्याचे लक्षात आले आणि उज्वल भविष्याच्या दृष्टिकोनातून वाद हा सामोपचाराने मिटविणे हा मध्यस्थ यांचा सल्ला पटला. त्यानुसार उभयतांनी एकमेकांबद्दल आत्मीयता, जिव्हाळा, प्रेम व्यक्त करत ज्येष्ठ नागरिकाने पुत्रांविरुद्ध मागितलेली दाद मागे घेतली. तदनंतर पिता-पुत्र यांनी साश्रुनयनांनी एकमेकांस आलिंगन दिले आणि एकमेकांचा हात हाती घेऊन जिल्हा प्राधिकरण सोलापूर कार्यालयातून आनंदी मनाने बाहेर पडले. हे विहंगम दृश्य पाहून सचिव नरेंद्र जोशी यांना मध्यस्थी यशस्वी झाल्याचे समाधान प्राप्त झाले. मध्यस्थी प्रक्रियेसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधीक्षक मल्लिनाथ शहाबादे यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच उभयता पिता व पुत्र यांचे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूरचे अध्यक्ष डॉ. शब्बीर अहेमद औटी यांनी अभिनंदन केले आणि सचिव यांनी समृद्ध आणि सुखमय भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. (पिता पुत्र यांच्या विनंतीवरून नावे गोपनीय ठेवण्यात आली आहेत.) हिंदुस्थानचे सर्वोच्च न्यायाधीश उदय उमेश लळीत यांच्या सोलापूर भेटीच्या पार्श्वभूमीवर या जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या यशास विशेष महत्त्व प्राप्त होत आहे.

## दुचाकीवरचा कॉलेजकुमार ठार; दोघे जखमी

### मंद्रुप-निंबर्गी रस्त्यावर अपघात

सुराज्य/दक्षिण सोलापूर

परीक्षा देऊन भंडारकवठे येथे आपल्या घराकडे दुचाकीवरुन निघालेल्या युवकाच्या दुचाकीला अपघात होऊन एक जण ठार झाला असून इतर दोन युवक किरकोळ जखमी झाले आहेत.ही घटना मंद्रूप-निंबर्गी या मार्गावर काल दुपारी तीनच्या दरम्यान घडली आहे.

आदर्श सिद्धाराम बिराजदार (वय १७.रा.भंडारकवठे, ता.द.सोलापूर) असे ठार झालेल्या युवकाचे नाव आहे तर या अपघातात त्यांच्यासोबत असलेले कृषीराज महादेव धनुरे( वय१७,भंडारकवठे) सचिन सोमनिंग चाबुकस्वार(वय १७,रा.भंडारकवठे)



हे दोघेजण किरकोळ जखमी झाले आहेत.

मंद्रूप येथील लोकसेवा विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता अकरावीच्या विज्ञान शाखेत वरील तिघे मित्र शिकत होते.शनिवारी तिघेजण परिक्षा देऊन आपल्या दुचाकीवरून भंडारकवठे येथे आपल्या घरी निघाले.मंद्रूप- निंबर्गी रस्त्यावरील काळे वस्तीजवळ ऊसाने भरुन भंडारकवठेकडे निघालेल्या ट्रॅक्टरची ट्रॉली रस्त्यावरून धावताना इकडे-तिकडे गेली. यात पाठीमागून येणारी या युवकांची दुचाकी ट्रॅक्टरच्या ट्रॉलीच्या चाकाखाली आली. यात आदर्श बिराजदार ठार झाला. त्याच्या पश्चात आई, वडील, एक मोठा भाऊ आजी आजोबा असा परिवार आहे.

## रेल्वे अधिकाऱ्याचे घर कार्यालयातील वायरमनने फोडले

सुराज्य/सोलापूर

दमाणी नगरातील सोनी सिटी येथील रेल्वे इंजिनियर त्यांच्या कुटुंबासह देवदर्शनाला परराज्यात गेल्यावर त्यांच्या नवीन घरात इलेक्ट्रिक वायरचे काम करणाऱ्या वायरमने घरातील २८ तोळे सोन्याचे व दोन तोळे चांदीचे दागिन्यांसह तब्बल साडेबारा लाखांचे साहित्य चोरले. पोलिसांनी त्या वायरमनला अटक केली असून मालही ताब्यात घेतला आहे. गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक जीवन निरगुडे यांनी भाऊराव अर्जुन वाघमोडे (रा. आदित्य नगर, आरटीओ ऑफिसजवळ) या संशयिताला जेरबंद केले.



### २८ तोळे सोन्याचे दागिने जप्त

सूरज सीताराम तिवारी हे त्यांच्या कुटुंबासोबत तामिळनाडूतील रामेश्वरला गेले होते. १ ते ५ ऑक्टोबर दरम्यान ते परगावी होते. त्याचवेळी त्यांच्या नवीन घरात कामे सुरू होती. त्यांनी विश्वासाने कामगारांकडे घराची चावी दिली होती. मात्र त्याने कोणी नसल्याची संधी साधत घरफोडी केली. घरात चोरी झाल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी फौजदार चावडी पोलिसांत धाव घेतली. त्यानंतर सहायक पोलीस आयुक्त डॉ. प्रीती टिपरे, प्रांजली सोनवणे, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दोरगे, सहायक पोलीस निरीक्षक निरगुडे, पोलीस हवालदार दिलीप भालशंकर, योगेश बर्डे, वाजीद पटेल, संजय साळुंखे यांनी त्याठिकाणी भेट दिली. कुलूप न तोडता बेडरूमच्या काचेच्या स्लाईडिंग डोअरमधून चोरटा आत शिरल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे बनावट चावीचा वापर करूनच चोरी झाल्याचा संशय पोलिसांना आला. त्यानुसार त्यांनी तपास सुरु करीत त्याठिकाणी आतापर्यंत भेटी दिलेल्यांवर पोलिसांनी वॉच ठेवला होता.

### पोलिसांच्या जाळ्यात अडकला भाऊराव

भाऊराव वाघमोडे हा चार ते पाच दिवसापूर्वी चोरलेल्या वस्तूंपैकी टॅब विकायला हा सिध्देश्वर मंदिराजवळ येणार असल्याची खबर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सहायक पोलिस निरीक्षक निरगुडे यांच्या पथकाने सापळा लावून त्याला जेरबंद केले व बनावट चावीचा वापर करून आपणच स्वतः चोरी केल्याची कबुली त्याने पोलिसांसमोर दिली.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आणा सामान! आपण कशातच मोडत नाही !

कल्याण
250-79-360

'वर्षा'वर भेटीचे सत्र

## राज ठाकरेंनंतर काँग्रेसच्या तीन बड्या नेत्यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

सुराज्य/मुंबई

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शनिवारी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी ही भेट झाली. राज ठाकरेंच्या भेटीनंतर काँग्रेसचे तीन बड्या नेतेही मुख्यमंत्री शिंदेंच्या भेटीसाठी वर्षावर दाखल झाले होते.

माजी शालेय शिक्षण मंत्री आणि वर्षा गायकवाड, मिलिंद देवरा आणि अमिन पटेल या काँग्रेस नेत्यांनीही मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी जाऊन भेट घेतल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. मात्र या भेटीमागे नेमकं



काय कारण आहे याबाबतची अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

राज ठाकरे दुपारी साडेतीनच्या सुमारास वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री शिंदे यांच्या भेटीसाठी पोहचले. दोघांमध्ये जवळपास दीड ते दोन तास चर्चा झाली. आरोग्यविषयक मुद्यांसंदर्भात ही भेट असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. दरम्यान अंधेरी पोटनिवडणुकीवरही या भेटीत राज ठाकरेंनी चर्चा केल्याचे म्हटले जाते. यामुळे आगामी पोटनिवडणुकीत मनसे भाजप आणि शिंदे गटाच्या युतीचा पाठिंबा देणार का हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. राज ठाकरेंच्या वर्षा बंगल्यावरील भेटीदरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह भाजपचे नेते मंगलप्रभात लोढा देखील उपस्थित होते. गेल्या दोन महिन्यात राज ठाकरे यांनी तीन वेळा मुख्यमंत्री शिंदेंची भेट घेतली आहे.

### काँग्रेस नेते भेटले विकासकामांबाबत

राज ठाकरे यांच्यानंतर काही तासांनी काँग्रेस नेत्या वर्षा गायकवाड, मिलिंद देवरा आणि अमिन पटेल यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. यावेळी शाळेच्या पटसंख्येसंदर्भात सुरु असलेल्या वादावर चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान हे तीन काँग्रेस नेते मतदार संघाच्या विकास कामांबाबतही भेटीस आल्याचे म्हटले जात आहे.

## बँकेच्या ताब्यात असलेल्या कारखान्यात चोरी

सुराज्य/सोलापूर : बँकेच्या ताब्यात असलेल्या पाणी फिल्टर करण्याच्या कारखान्यातील खिडकीचे ग्रील तोडून चोरट्याने ९५ हजारांचे साहित्य पळविले. ही चोरी चिंचोली एमआयडीसी(ता.मोहोळ) येथील कल्याणी इंडस्ट्रीज येथे बुधवारी दुपारच्या सुमारास घडली.

यासंदर्भात युनियन बँकेचे कर्मचारी कपिल विजयसिंह बिलवाल (रा. अहमदनगर) यांनी मोहोळ पोलिसात नुकतीच फिर्याद दाखल केली.बँकेच्या ताब्यात असलेल्या कल्याणी इंडस्ट्रीज (प्लॉट नं.१७) या पाणी फिल्टर प्लांटच्या पाठीमागील खिडकीचे ग्रीन तोडून चोरट्याने आत प्रवेश केला. आणि पाणी फिल्टरचे यंत्र, स्टोरेज टँक आणि इतर साहित्य असा माल चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास फौजदार जाधव करीत आहेत.

CMYK

# दूध 'मापा'तील 'पापा'ला चाप

## वैद्यमापन विभागाचा आदेश; दूध उत्पादकांची लूट थांबणार

## आता 'ॲक्युरसी' १०० ऐवजी १० मिली 'अनिवार्य'

### दै. 'सुराज्य' च्या पाठपुराव्याने वैद्यमापनची कार्यवाही

✔ सुराज्य/सोलापूर

दूध उत्पादक शेतकऱ्यांकडून दूध खरेदी करताना दूध डेअरीमध्ये इलेक्ट्रॉनिक वजन काट्याचा वापर केला जातो. त्या काट्याची सध्याची ॲक्युरसी १०० मिली इतकी आहे. त्यामुळे दुधाची ॲक्युरसी १०० मिलींच्या पटीत होत असल्याने शंभर मिलीपेक्षा कमी असणारे दूध हे बिनमापी दूध संस्थेच्या खात्यामध्ये जात होते. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत होते. वजन काट्याच्या माध्यमातून शेतकऱ्याच्या होणाऱ्या आर्थिक लुटीवर 'दै.सुराज्य' ने वेळोवेळी प्रकाश टाकत शेतकऱ्यांच्या दुधाच्या 'मापात पाप' दुधातील 'फॅट कमी' तर वजनात 'काटामारी' या मथळ्या खाली शेतकऱ्यांच्या व्यथा सरकारपर्यंत पोहचवित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला याची दखल घेऊन वैधमापन विभागाचे नियंत्रक डॉ. रविंद्रकुमार सिंघल यांनी वजन काट्याची ॲक्युरसी १० मिली करण्याचे परिपत्रक काढून आदेश दिले आहेत. त्यामुळे दूध खरेदीतील गैरव्यवहाराला चाप बसून शेतकऱ्यांची लूट थांबली जाणार आहे. या निर्णयाचे दूध उत्पादक शेतकऱ्यांकडून स्वागत केले जात आहे.

दूध उत्पादक शेतकऱ्यांतून दुधाच्या वजन व फॅट यामध्ये तफावत केली जात आहे, अशी ओरड झाली. या विषयी दै. सुराज्यच्या वृत्ताचा आधार घेत शेतकऱ्यांनी याबाबत वैधमापन विभागाकडे तक्रारी केल्या. वरिष्ठ कार्यालयाकडे पाठपुरावाही केला. यानंतर समिती गठीत करून या विषयीची चौकशी करण्यात आली.या समितीच्या अहवालामध्ये १०० मि.ली दुधाच्या पटीमध्ये दूध उत्पादकांची फसवणूक होत असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळेच सिंघल यांनी वजन काट्याची ॲक्युरसी १० मि.ली करण्याचे परिपत्रक काढत याची अंमलबजावणी १ जानेवारी २०२३ पासून करण्याचे आदेश दिले आहेत.




### दै. सुराज्यचे आभार

दूध उत्पादक शेतकऱ्यांकडून दूध खरेदी करताना गावोगावी असणाऱ्या दूध संस्था, संकलन केंद्राकडून वापरण्यात येणाऱ्या इलेक्ट्रॉनिक वजन काट्याची वैधमापन विभागाने तपासणी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी सातत्याने शेतकऱ्यांतून होत होती. तर आंदोलन अंकुश या शेतकरी संघटनेने व शेतकऱ्यांनी तक्रार केल्यानंतर आता ॲक्युरसी १० मि.ली असणे अनिवार्य असल्याचा आदेश निघाल्याने अनेक दूध उत्पादक शेतकऱ्यांनी दै. 'सुराज्य'च्या पाठपुराव्याने आम्हांला न्याय मिळाल्याच्या भावना व्यक्त करीत आभार मानले.

### नव्या वर्षापासून अंमलबजावणी

इलेक्ट्रॉनिक वजन काट्याची १० मिली ॲक्युरसी अनिवार्य असलेल्या निर्णयाची अंमलबजावणी १ जानेवारी २०२३ पासून करण्यात येणार आहे. पुढील दोन महिन्यांत दूध संस्थांनी योग्य ते बदल करून ॲक्युरसी १० मि.ली. करावी. या कालावधीत बदल न केल्यास संबंधित दूध संस्थावर कारवाई करण्यात येणार आहे.

## डब्ल्यूआयटीच्या

# 'अरिहंत अब्बड' ला ३०.६ लाखांचे पॅकेज

✔ सुराज्य/सोलापूर : वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीमधील कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या अंतिम वर्षात शिकत असलेल्या अरिहंत महेंद्र अब्बड या विद्यार्थ्याने ३०.६ लाखाचे आणि प्रतिक जैन या विद्यार्थ्याने १९ लाखाचे घसघशीत पॅकेज मिळविले आहे. त्याचबरोबर श्रेयांश संचेती (१७.५ लाख), सोनाली नोगजा (११ लाख), तन्मय शांडिल्य (१० लाख), गुरव लोढा, अथर्व चौधरी (९.५ लाख), राहुल पाटील, सना शेख, रेहान रचभारे, प्रियांका भट, विशाखा उकरंडे, माधुरी कालाणी (सर्वांना ९ लाख) अशा अनेक विद्यार्थ्यांना आकर्षक पॅकेजची नोकरी मिळाली आहेत. सिव्हिल शाखेचा प्रतिक बदोडे आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग शाखेचा कौशिक जैन या दोन्ही विद्यार्थ्यांनी 'बायजूज' चे दहा लाखाचे पॅकेज मिळवून आपल्यातील बिजनेस डेव्हलपमेंट असोसिएटचे स्किल सिद्ध केले आहे.



### बदलत्या तंत्रज्ञानाची तत्पर उपलब्धी हेच यशाचे गमक : डॉ. गांधी

बदलत्या तंत्रज्ञानाला अनुसरून पायाभूत सुविधा व गुणवत्तापूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्याची तत्परता वालचंद शिक्षण समूहाची असते. विद्यार्थी केंद्रबिंदू म्हणून वाहून घेतलेले शिक्षक हे डब्ल्यूआयटीच्या यशाचे गमक आहे, अशी प्रतिक्रिया वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी यांनी दिली.

## जागतिक अन्न दिन विशेष

# अन्नाची नासाडी : सामाजिक गुन्हा

**१६ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक अन्न दिन म्हणून साजरा केला जातो. जगभरात विविध दिन उत्साहात साजरे केले जातात. त्यापैकी अन्न दिन महत्वाचा मानावा लागेल, कारण त्याचा थेट मानवी जीवनाच्या आस्तित्वाशी संबंध आहे. अन्न सुरक्षेबाबतची एकंदर परिस्थिती पाहता अन्न दिनाबाबत जागरूकता वाढीस लागण्याची गरज आहे. परंतु आजही आपण अन्न सुरक्षेबाबत आणि अन्नाच्या नासाडीबाबत गंभीर नाहीत असेच म्हणावे लागेल.**

'अन्न हे पूर्णब्रह्म आहे' अशी आपली संस्कृती सांगते पण ही संस्कृती आपण विसरत चाललो आहे की काय असा प्रश्न पडावा, असा एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे.

संयुक्त राष्ट्रे पर्यावरण कार्यक्रम आणि भागीदार संस्था डब्ल्यूआरएपीच्या अहवालानुसार आपल्या देशात दरवर्षी ६८ दशलक्ष टन धान्याची नासाडी केली जाते. यातील ६१ टक्के अन्न घरातून, २६ टक्के अन्न सेवांमधून तर १३ टक्के अन्न किरकोळ क्षेत्रात वाया जाते. भारतासारख्या कृषिप्रधान देशात इतक्या मोठ्या प्रमाणात अन्न वाया जाणे ही भूषणावह बाब नाही. भारतासारख्या विकसनशील देशात जिथे दररोज साठ टक्के लोक उपाशी किंवा अर्धपोटी झोपतात, तिथे अन्नाची अशी नासाडी परवडणारी नाही. वाया जाणारे हे अन्न जर गोरगरिबांच्या, भुकेलेल्यांच्या मुखात पडले तर देशात कोणीही उपाशी झोपणार नाही पण आपल्याला आपल्या संस्कृतीचा विसर पडत चालला आहे. आपल्याला हवे तेवढेच अन्न पानात काढून घ्यायचे आणि तेवढेच खायचे अशी आपली परंपरा आहे. खाऊन माजावे पण फेकून माजू नये अशी आपली आजी सांगायची हेही आपण विसरून गेलो आहोत. पाश्चात्य देशात हॉटेलातही पानातले अन्न टाकणे हा



सामाजिक गुन्हा मानला जातो. भुकेने व्याकुळ झालेल्या लोकांची आठवणही अन्न टाकून देणाऱ्या या सोकावलेल्या श्रीमंतांना येत नाही. अन्नाची नासाडी हा सामाजिक गुन्हा आहे, याचे भान अन्न टाकून देणाऱ्या श्रीमंतांना राहिले नाही.

पोटातील भूकेची आग भागवण्यासाठी देशातील कोट्यवधी लोक भीक मागतात. आदिवासी, दुर्गम भागात आजही लाखो लोक पुरेसे अन्न मिळत नाही म्हणून कुपोषित आहेत तर दुसरीकडे दररोज लाखो टन अन्न फेकून दिले जाते ही विसंगती बदलायला हवी. वाया जाणारे हे अन्न गोरगरिबांच्या मुखात पडेल, अशी व्यवस्था असायला हवी. हैदराबाद, चेन्नई, दिल्ली, कोलकाता, मुंबई, बंगळुरु यासारख्या मोठ्या शहरात हॉटेल, रेस्टॉरंट, घरात उरलेले अन्न गरिबांना मिळावे यासाठी कम्युनिटी किचन ही संकल्पना अमलात आणली गेली. या संकल्पनेनुसार शहरातल्या विविध भागातल्या रस्त्यावरच्या कम्युनिटी किचनच्या केंद्रातल्या मोठ्या फ्रीजमध्ये उरलेले अन्न ठेवले जाते. भुकेलेल्यांनी ते काढून घ्यावे, अशी सुविधा या केंद्रात आहे पण ही संकल्पना शहरातील मोठ्या शहरातच आहे, ती ही व्यापक नाही. कम्युनिटी किचनसारखी संकल्पना प्रत्येक शहरात व्यापक स्वरूपात राबवायला हवी म्हणजे वाया जाणारे अन्न भुकेलेल्यांच्या मुखात जाईल आणि अन्नाची नासाडीही थांबेल.

**- श्याम ठाणेदार, दौंड, जिल्हा पुणे. (९९२२५४६२९५)**

# नागरी बँकासमोरील आव्हाने, समस्यांबाबत चर्चासत्र




✔ सुराज्य/सोलापूर

**महाराष्ट्र शासन-सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग व सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने बँकासमोरील आवाहने यावर चर्चासत्र संपन्न झाले.**

सहकार आयुक्त अनिल कवडे यांनी नागरी सहकारी बँकांनी बँकींग रेग्युलेशन अँक्ट, सहकार कायदा व रिझर्व्ह बँकेच्या वेळोवेळीच्या डायरेक्टीव्हजनुसार कामकाज करावे. विशेषतः कर्ज देताना कायदेशीर पूर्तता करणे गरजेचे असते त्याची काळजीने पूर्तता करावी जेणेकरुन कर्ज थकीत होणार नाही व प्रसंगी वसूलीसाठी अडचण होणार नाही. संचालक मंडळांनी बँकेच्या कामकाजावर लक्ष देणे गरजेचे आहे, असे सांगितले.

यावेळी अप्पर निबंधक, शैलेश कोतमिरे, कबडे यांनी मार्गदर्शन केले. बँकींग तज्ञ गणेश निमकर यांनी सहकारी बँकेमधला ग्राहक सहकार बँकेतच रहावा, तसेच नवीन ग्राहक मिळवताना सध्याचा आपला ग्राहक' टिकवावा. एनपीए वाढू नये याची काळजी व नियमितपणे वसुलीचे प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले.

सोलापूर जिल्हा बँक्स् असोसिएशनचे चेअरमन मोहन दाते यांनी सदर चर्चासत्राचे प्रास्ताविक केले. कुंदन भोळे- जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांनी सर्वांचे स्वागत केले. नागनाथ कंजेरी यांनी सदर चर्चासत्रात उपस्थित मान्यवरांचे व सोलापूर जिल्हयातीन नागरी सहकारी बँकांचे उपस्थित चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ व सीईओ यांचे आभार मानले.

कार्यक्रमास सहकार खात्याचे विष्णू डोके - जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग - १, सहकारी संस्था, सोलापूर व सोलापूर जिल्हा बँक्स असोसिएशनचे संचालक राजगोपाल झंवर, लुणावत, किसन माळी, राजेंद्र कोठावळे व प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी ढवळे उपस्थित होते. राजेंद्र कोठावळे यांनी चर्चासत्राचे सूत्रसंचालन केले.

# राशीभविष्य

## दि. १६ ऑक्टोबर ते २३ ऑक्टोबर २०२२

### मेष

**मनोधैर्य वाढेल**

आत्मविश्वास - निश्चयाने वाढून यशाच्या मार्गावर जाऊ शकाल. शांतता प्रिय राहाल. घरापासून दूर जाण्याचे योग. नोकरी निमित्ताने लांबचे प्रवास घडतील. आरोग्य बिघडेल सांभाळा. स्थावर शेती विषयक लाभ होतील. नोकरीत व्यवसायात दक्ष राहावे लागेल. हित शत्रूंवर मात करू शकाल. प्रवासात अडथळा. शत्रूचा जोर उत्तरार्धात कमी होईल सहसा कर्ज घेणे टाळावे. महत्वाकांक्षी पणा कामाला येईल. घर वाहनांवर खर्च होईल. आरोग्याची काळजी घ्या.

### वृषभ

**कणखर बनाल**

कार्याबद्दलचा आत्मविश्वास वाढेल. कार्य यशस्वी होईल. फार मनस्वी बनवू नका. निर्णय चुकतील सणांचा आनंद घ्याल. भावंडांना आरोग्याचा त्रास खर्च तुमच्या प्रगतीत थोडा अडथळा संभवतो प्रवास सांभाळून करावा प्रवासात कटकटी होण्याचा संभव आहे शांत रहावे लागेल कौटुंबिक वैवाहिक जीवनात त्रास जाणवेल जोडीदाराशी मतभेद बोलणे स्पष्ट चांगले राहणार नाही पत्नीकडून आपले कौतुक होईल मुलांची काळजी घ्यावी लागेल नोकरीत किंवा व्यवसायात वेलंब करत असलेली कामे त्वरित होतील खरच कमी कोर्टकचेरीची कामे मार्गी लागतील

### मिथुन

**मन स्थिर ठेवा...**

किरकोळ कारणावरून मानसिक अस्थिरता जाणवेल. भावंडांमध्ये गैरसमज वाढतील. जुने वाद पुन्हा नव्याने उद्भवू शकतात. शांत राहणेच योग्य ठरेल. घरापासून लांब जाण्याचे प्रसंग येतील. घर बदलावे लागेल. मानसिक तणावाचे प्रसंग अनुभवास येतील. मृत्युपत्र वारसा विमा व्यवहार कटकटी. वारस धनाचा वाद निघेल कोर्टाची पायरी चढावी लागेल जमिनीच्या वादातून भावाभावामध्ये कलह निर्माण होऊ शकतो. माघार घ्यावी लागेल. आरोग्याची काळजी घ्या.

### कर्क

**विलंब मान्य करा...**

नोकरी व्यवसायातील प्रश्न स्वतः सुटतील खरे , पण काही गोष्टींना विलंब होणार आहे . अभिलाशा नाहीशा होणार नाहीत. कामे उशिरा झाल्याने मनस्ताप संभवतो. तुमचे वर्चस्व कायम ठेवू शकाल . कोर्ट कचेरीच्या कामात यश मिळेल. शांततेत प्रवास करा. जमिनीच्या संदर्भातील फायदे मिळू शकतील .परंतू वेळ जास्त जाईल. धार्मिक कार्यात सहभाग नोंदवू शकाल पर्यंत बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल लांबचा प्रवास संभवतो गृहसौख्य कमी. घरामध्ये नवीन खरेदी ठरू शकाल. मोठ्यांकडून आपल्या कामाचे कौतुक केले जाईल परंतु त्यांची काळजीही घ्यावी लागेल. व्यवसायात मंदी आल्याने मानसिक ताण वाढेल.

### सिंह

**शांत रहावे लागेल..**

ग्रहांची अनुकूलता मिळणार परंतु वादांच्या प्रसंगां पासून लांब राहा. सुरुवातीच्या काळातच कामे मार्गी लागल्याने समाधान मिळेल. आर्थिक स्थैर्य वाढत जाईल. आर्थिक नियोजन उत्तम राहील मुलांकडून समाधान मिळेल त्यांच्या शैक्षणिक कामामध्ये लक्ष घालावे लागेल आपल्याकडून वाद वाढू नयेत याची काळजी घ्या. सद्गुरू कृपा लाभेल एखाद्या धार्मिक कार्याचे नियोजन करू शकाल धार्मिक गोष्टीमध्ये मन रमेल. घरामध्ये वाद होऊ शकतात बोलण्यावर नियंत्रण ठेवायला पाहिजे आहे आरोग्य उत्तम राहिल्याने आनंदी असाल.

### कन्या

**ग्रहांची साथ लाभेल.**

ग्रहांची उत्तम साथ मिळणार आहे. प्रगतीचा आलेख उंचावून शकाल. बँकेची कामे मार्गी लागतील त्यातून मिळणारे समाधान गृहसौख्य वाढवेल.नवीन जागा खरेदी कराल. सामाजिक बांधिलकी जपाल. पत्नीकडून आपले आरोग्याची काळजी घेतली जाईल घरामध्ये नवीन वस्तूची खरेदी होऊ शकते वादाला सामोरे जावे लागेल आपले म्हणणे ग्राह्य धरले जाणार नाही त्रास संभवतो मुलांच्या बाबतीत विशेष काळजी घ्या. सावध राहणेच योग्य ठरेल. लगेच विश्वास टाकू नये धोका संभवतो समोरच्याकडून तुमचे कौतुक होईल. गृहसौख्य उत्तम.

### तूळ

**निर्णय बदलूनका..**

निर्णयात झालेल्या चुका व बिघडलेली तब्येत यांचा फटका बसणे शक्य आहे . घर दुरुस्तीची कामे करावी लागतील .वरिष्ठांकडून आपल्या कामाचे कौतुक होईल. शेतीच्या कामात यश मिळेल. मोठी खरेदी केली जाईल. कौटुंबिक निर्णय योग्य ठरेल. भावंडां कडून चांगला प्रतिसाद मिळाल्याने कार्य साध्य करू शकाल. आपल्या हातून एखादे धार्मिक कार्य घडू शकते. बाहेर गेल्या वरती आपल्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी लागेल .एखादी घटना आपले मन हेलावणारी घडू शकते. सावध रहा. जोडीदाराकडून मदत होईल .मानसन्मान मिळेल .मुलांकडून आपल्याला योग्य सन्मान मिळाल्याने आपण निरोगी आहोत, याची साक्ष मिळेल.

### वृश्चिक

**मनोधैर्य खचू देऊ नका**

ज्येष्ठांच्या नाराजी, मान हानी, कामात अडथळे निर्माण होऊ शकतात विसंबून राहणे नको. समोरच्याकडून जास्त अपेक्षा ठेवू नयेत. खर्च वाढेल. प्रवासात अडचणी निर्माण होऊ शकतात परंतु, नवीन व्यक्तींशी चांगले संभाषण होऊ शकते. त्यातून लाभ संभवतो. जोडीदाराबरोबर मतभेद संभवतात. मुलांच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे. मन कमकुवत होईल. चिंता राहील. बदनामी पासून सावध रहा. धार्मिक कृत्यांमध्ये आपला रस वाढेल. आपल्या कडून एखादे चांगले काम काम होईल. कौटुंबिक स्वास्थ्य उत्तम. घरामध्ये आनंदी वातावरण. यांच्या शिक्षणासंबंधी आपली चिंता वाढेल. बहिणीकडून कौतुक होईल.

### धनु

**प्रवास सुखकर होईल**

प्रवासात फायदाच होईल. निर्णायक शक्ती आधार देऊन बाजू सावरेल. आरोग्याची काळजी कराल. मानसिक ताण कमी होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल आपली काळजी करणारे कोणीतरी आहे याचा प्रत्यय येईल. समाधानी राहाल. धार्मिक कार्यात आपला सहभाग नोंदवू शकाल आपल्या यशाचे कौतुक केले जाईल. जोडीदार समाधानी असेल. शेतीच्या कामामध्ये यश नवीन वास्तु खरेदीचे योग जोडीदाराकडून आपल्या इच्छा पूर्ण होतील परंतु आपले मन चिंतित करणारे कार्य निर्माण होऊ शकतात सावधानता बाळगावे समोरच्यावर लगेच विश्वास टाकला जाणार नाही त्यांचे म्हणणे आपल्याला द्विधा मनस्थितीत टाकू शकतो.

### मकर

**धैर्याने वागावे लागेल...**

अनेक प्रश्न उपस्थित होतील. अशात कमी बोलणे, गप्प बसणे हा उत्तम मार्ग साधावा लागेल. चांगल्या गोष्टींचाही वार्ता ऐकावयास मिळतील. कला क्षेत्रात प्राविण्य मिळू शकेल . वास्तु व आरोग्याची काळजी घ्यावी लागेल वृद्धांना साठी आपण नेहमीच लक्ष पूर्वक नियोजन करत असता त्यातूनच आपल्याला अधिक समाधान मिळेल धार्मिक वृत्ती वाढेल या काळात आपण आपले म्हणणे दुसऱ्यांवर ती लादू नयेत किंवा अपेक्षा कमी ठेवाव्यात. समाधानी रहाल. मुलांकडून समाधान मिळेल. त्यांच्या शैक्षणिक अडचणी दूर करण्यास आपण सक्षम असाल. आर्थिक नियोजन व्यवस्थित केल्यामुळे घरामध्ये गोड कौतुक केले जाईल.

### कुंभ

**सुसंवाद साधाल**

ग्रहांची उत्तम साथ मिळणार असल्याने जीवन प्रवास सुखकर होईल. नवीन ओळखीतून लाभ होतील. अनेक दिवसांपासून रखडलेले, कार्य साध्य करू शकाल. नव्या इच्छा नव्या कल्पनांना वाव मिळेल. व्यवहारातील तातडीचे निर्णय लाभदायक ठरू शकतील. नोकरी क्षेत्रात आपले वैचारिक म्हणणे ज्येष्ठांना रुचेल. पोटाचे आरोग्य जपा. बढतीचे योग, परंतु कष्टप्रद. वरिष्ठांची मर्जी आपल्याकडून सांभाळली जाईल. नोकरीत हितशत्रूंचा प्रभाव जास्त राहील. आपल्या बोलण्यातूनच आपले काम काम बिघडू शकते. शेतीच्या कामात अपयश. कोर्टाच्या कामात दिरंगाई चालणार नाही. जोडीदाराकडून कामाचे कौतुक. आर्थिक नियोजन उत्तम राहील.

### मीन

**सावध रहावे**

आपण द्विधा अवस्थेत असणार आहात, कलागुणांना वाव मिळेल. आपले मन स्थिर ठेवणे हेच आपल्यासाठी मोठे आव्हान असेल. भाऊबंदकीतील तंटे, विचार विनिमयातूनही ते सुटू शकतील. नोकरीधंद्यात अपेक्षित बदल घडून येतील. शिक्षणात अडथळा निर्माण होऊ शकतो. अचानक नोकरी सुटल्याने आर्थिक चणचण निर्माण होईल. प्रेमप्रकरणात लाभ होतील विवाह जुळेल. उपासनेत अडथळा आला तरी नेटाने पूर्ण करा. धार्मिक कार्यक्रमांमध्ये आपल्याला प्रतिसाद उत्तम राहील. महिलांसाठी-आपले म्हणणे समोरच्याला व्यवस्थित समजावून सांगावे. बोलण्यातून गैरसमज निर्माण होऊ शकतील. जोडीदाराशी मतभेद वाढवून देऊ नका.

**।। ज्योतिर्विद् ।।**

**श्री. विठ्ठल जोशी वैरागकर, श्री. दत्ता क्षीरसागर, सोलापूर.**

***

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# तीन महिन्यापांसून माढा न.पं.च्या सफाई कामगारांचा पगार नाही

## बुधवारपासून काम बंदसह धरणे आंदोलनाचा इशारा

## २ कोटीहून अधिक थकबाकी

सुराज्य/माढा

माढा नगरपंचायतीच्या सफाईकामगारांचे गेल्या तीन महिन्यापासून वेतन मिळाले नसून मंगळवारपर्यंत वेतन न मिळाल्यास काम बंद आंदोलनासह नगरपंचायतीचे समोर बेमुदत धरणे आंदोलन आणि हालगी नाद आंदोलन करण्याचा इशारा एका निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

माढा शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी दिवसरात्र कष्ट करणारे माढा नगरपंचायतीच्या सफाई कामगारांचे जुलै महिन्यापासून पगार दिले गेले नाहीत. कुठल्याही पध्दतीचे दुसरे उदर्निर्वाहाचे साधन नसणार्या या कामगारांची उपासमार सुरू आहे. यातच दिवाळी सण अगदी तोंडावर आला असताना मागील पगारही अजून मिळाला नसल्याने सफाई कामगारांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. याबाबतीत मुख्याधिकारी यांच्याशी संपर्क केला असता त्यांचा संपर्क होऊ शकला नाही. ट्रेनिंग निमित्ताने ते बाहेरगावी असल्याचे समजते आहे.

कामगारांचे पगार करण्यासाठी आम्ही करवसुली करतो आहोत. लवकरात लवकर पगारी करण्याच्या प्रयत्नात आहोत. सफाई कामगारासह इतर कंत्राटी कामगारांच्या पगाराला महिन्याला जवळपास साडेचार लाख रूपये लागतात. याचबरोबर सार्वजनिक पाणीपुरवठा सार्वजनिक दिवाबत्ती यांचे वीज बिल प्रतिमहिना ५ लाख येते. यासह इतर खर्च मिळून महिन्याला कमीतकमी १५ लाख रूपये खर्च येतो. हा सर्व खर्च हा नगरपंचायती च्या नफा फंडातून केला जातो. यासाठी नागरिकांची करवसूली महत्वाची असून माढा नगरपंचायतीचे २कोटीहून अधिक थकबाकी येणे आहे, नगराध्यक्ष अॅड. मिनल साठे यांनी सांगितले.

### नागरिकांनी करभरणा करावा : साठे

नागरिकांनी स्वतःहून आपले कर नियमित भरले तर अडचणी येणार नाहीत. यामुळे नागरिकांनी तातडीने आपले कर भरून नगरपंचायतीस सहकार्य करण्याचे आवाहन नगराध्यक्षा अॅड. मिनल साठे यांनी केले आहे.

# कोंकण कन्या बँडकडून रसिकांनी अनुभवली स्वरांची दिवाळी

### भाव-भक्ती गीतांपासून ते देशभक्तीपर गीत सादरीकरणाला रसिकांची दाद

सुराज्य/सोलापूर



पाच गायिका सामूहिकपणे गात असूनही क्षणाचाही फरक न राहू देता साधलेले अत्यंत अचूक टायमिंग. . . चक्क ताना घेतानाही पाचही गायिकांची अचूकता आणि त्यांना अत्युत्कृष्ट निवेदनाची जोड असा तिहेरी अन् अपूर्व सांगीतिक संगम कोंकण कन्या बँडने सोलापूरकरांना घडवून आणला. यानिमित्ताने प्रिसीजन फाउंडेशन आयोजित प्रिसिजन गप्पांमध्ये दुसऱ्या दिवशी सादर झालेल्या कोंकण कन्या बँडकडून रसिकांनी स्वरांची दिवाळी अनुभवली.

प्रिसीजन गप्पांच्या दुसऱ्या दिवशी कोंकण कन्या बँडने सोलापूरकर रसिकांची मने जिंकली. हटके शैली, सुगम, शास्त्रीय संगीत, हार्मनी, इंडो वेस्टर्न, इंग्लिश रॅप, सरगम या साऱ्यांचा संगम घडवून आणून सोलापूरकर रसिकांना कोंकण कन्या बँडने अत्युच्च दर्जाची सांगीतिक मेजवानी दिली.

रविराज कोलथरकर यांचे दिग्दर्शन, अभिनेत्री, निवेदिका दीप्ती भागवत यांचे बहारदार निवेदन असलेल्या कोंकण कन्या कार्यक्रमात कलाकार अरुंधती तेंडूलकर, आरती सत्यपाल, रसिका बोरकर, निकिता घाटे आणि साक्षी मराठे यांनी भन्नाट गीते सादर करुन धमाल उडवून दिली. त्यांना रिदमची साथ विशाल सुतार यांनी तर संवादिनीवर रविराज कोलथरकर यांनी साथ दिली. विशेष म्हणजे तब्बल १०० गाणी कोणताही कागद हातात न घेता या पाच गायिकांनी सादर केली.

प्रारंभी प्रिसीजन उद्योग समूहाचे चेअरमन यतीन शहा, प्रिसिजन फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा, प्रिसीजनचे कार्यकारी संचालक करण शहा, प्रिसीजन फाऊंडेशनच्या संचालिका मयुरा शहा यांच्या हस्ते कलावंतांचा सन्मान करण्यात आला.

'गणराया ताराया यावे धावूनी' या प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर 'पंचतुंड नररुंडमाळधर... ' ही १८८० साली अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी 'शाकुंतल' या पहिल्या संगीत नाटकासाठी रचलेली नांदी भक्तिसंगीत आणि वेस्टर्न प्रकारात सादर झाली. यानंतर 'केंव्हा तरी पहाटे' या गझलेने बहार आणली. 'आखों की गुस्ताखियां... ' या गीताला रसिकांनी जोरदार टाळ्यांच्या गजरात दाद दिली. 'मला हे दत्तगुरू दिसले' या गीतावर कोंकण कन्यांनी सोलापूरकरांना ठेका धरायला भाग पाडले. 'ये काली काली आँखे... ' या तराना आणि वेस्टर्न प्रकारात सादर झालेल्या गीताला रसिकांनी वन्स मोअर दिला. 'रुपेरी वाळूत माडाच्या बनात', 'रूप पाहता लोचनी', 'विठू माऊली तू', 'कानडा हो विठ्ठलू' या गीतांनाही रसिकांनी जोरदार टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

यावेळी रविराज कोलथरकर यांनी 'कहीं दूर जब दिन जब', 'होशवालों को खबर क्या', 'आओगे तुम ओ साजना', आदी गीते वेगळ्याच ढंगात सादर केली.

### आज भरणार 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'

आज रविवारी (ता. १६) 'महाराष्ट्राची हास्यजत्रा-बिहाइंड द सीन' हा कार्यक्रम होणार आहे. शिवछत्रपती रंगभवन सभागृहात सायंकाळी सव्वासहा वाजता होणार आहे.



## तृतीय पंथियांना प्रमाणपत्र, ओळखपत्र वाटप

सुराज्य/सोलापूर : सामाजिक न्याय विभागाच्या वर्धापन दिनानिमित्त नियोजन भवन येथे जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या हस्ते तृतीय पंथियांना प्रमाणपत्र आणि ओळखपत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी संजीव जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, सहायक आयुक्त कैलास आढे आदी उपस्थित होते. सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय आणि जिल्हा जात पडताळणी प्रमाणपत्र समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक न्याय भवन येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. समाज कल्याण विभागाच्या सहयोगाने त्यांना केंद्र सरकारच्या राष्ट्रीय पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी केलेल्या तृतीयपंथीय व्यक्तींना ओळखपत्र व प्रमाणपत्र देण्यात यत्त त्यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. यावेळी समाज कल्याण विभागाच्या वतीने राबवण्यात आलेल्या आहवालाचे प्रकाशन जात प्रमाणपत्र पडताळणी समिती सदस्या छाया गाडेकर, संशोधन अधिकारी सचिन कवले, समाज कल्याण अधिकारी राजेंद्र बुजाडे, निरामय आरोग्यधामच्या अध्यक्ष सीमा किणीकर, पत्रकार भरतकुमार मोरे, ज्येष्ठ नागरिक जिल्हास्तरीय समितीचे सदस्य महादेव माने यांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती सोलापूर यांच्या कार्यालयाकडून जात वैधता प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.



## शिक्षणाधिकाऱ्यांनी मैंदर्गी कन्नड शाळेला अचानक दिली भेट

सुराज्य/अक्कलकोट : डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांचे जयंती, जागतिक हात धुणे दिन साजरा होताना जि. प. प्राथ शिक्षण अधिकारी किरण लोहार व अक्कलकोट तालुक्याचे गट शिक्षणाधिकारी कुदूशिया शेख व जि प. मुख्यालय चे राऊत यांनी अचानकपणे मैंदर्गी कन्नड शाळेला भेट दिली. यावेळी वाचन, भाषण व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी अनुष्का सुनील बिराजदार हिचे इंग्रजी मधील भाषण ऐकून लोहार यांनी तिला ५०० रूपये बक्षीस दिले. यावेळी रमेश जुजगार व सहशिक्षिका चिंचोळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचलन मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी यांनी केले व आभार प्रदर्शन मैंदर्गी केंद्राचे केंद्र प्रमुख श्रीशैल हडलगी यांनी मानले.



## वृत्तपत्र विक्रेत्यांना दिवाळी साहित्य वाटप

सुराज्य/मंगळवेढा : दै. दामाजी एक्सप्रेस कार्यालयात शनिवारी वृत्तपत्र विक्रेता दिन साजरा करण्यात आला. यावेळी वृत्तपत्र विक्रेत्यांचा गुलाबपुष्प व पुस्तक देवून सत्कार करण्यात आला. तसेच त्यांना दिवाळीनिमित्त प्रत्येकी पाच किलो साखर, उटणे, साबण, सुगंधी तेल, शाम्पू आदिंचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास संपादक दिगंबर भगरे, विजय भगरे, बिराप्पा भंडगे, अविनाश जाधव, सुरेश पाटील, सचिन गायकवाड, तानाजी रायबान, दत्तात्रय रायबान, आदित्य महामुनी, प्रथमेश हजारे आदि उपस्थित होते.

# कामात कुचराई केल्यास कारवाई : वाघमारे

## आज जिल्हातील सर्व मतदान केंद्रावर आधार लिंकिंग मोहिम

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यात मतदान ओळखपत्रआधार लिंक करण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. निवडणूक शाखेच्या वतीने या मोहिमेला गती देण्यासाठी रविवारी सोलापूर जिल्हातील सर्व मतदान केंद्रावर आधार लिंकिंग मोहिम घेतली जाणार आहे. प्रत्येकांनी जबाबदारी काम करावे कामात कुचराई केल्यास कारवाई करण्याचा इशारा उपजिल्हानिवडणूक अधिकारी भारत वाघमारे यांनी दिला आहे.



रविवार १६ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या या मोहिमेचा मतदारांनी याचा लाभ घ्यावा असं आवाहन करताना प्रत्येक मतदान केंद्रावरील बीएलओ नी या कामात सहकार्य करावे कामात कुचराई केल्यास कारवाई करण्याची तंबी दिली आहे.

सोलापूर जिल्हात आता पर्यंत जिल्ह्यातील ३५ लाख ६३ हजार ५५० जणांपैकी फक्त १४ लाख ७ हजार २२६ मतदारांनी आपले आधार कार्ड लिंक केले आहे. सहा लाख १६ हजार ८०८ मतदारांपैकी फक्त ८१ हजार ६२९ जणांनी आधार लिंकिंग केले आहे.

तालुका निहात करमाळा मध्ये १,२३,९८५, माढा मध्ये १,५४,७३५, बार्शीत १,४४,३४४, मोहोळ मध्ये १, ५२,५११, अक्कलकोट तालुक्यात १,८३,९४२, दक्षिण सोलापूर मध्ये ७५,०६२, पंढरपूरात १,३६,५७०, सांगोला मध्ये २,११५४६, माळशिरस मध्ये १,४२,९०२ असे लिंकिंग झाले आहे. अधार लिंकींग मध्ये सांगोला अव्वल आहे. दक्षिण सोलापूर नवव्या क्रमांकावर आहे. निवडणूक आयोगाच्या आदेशावरून प्रत्येक नागरिकाने आपले आधार कार्ड मतदान कार्डला लिंक करणे आवश्यक आहे. आधार कार्ड नसेल तर त्याला पर्यायही आहेत. ड्रायव्हिंग लायसन्स, शाळेचा दाखला आदी ११ प्रकारची कागदपत्रे जोडता येतात. महा-ई सेवा केंद्रात किंवा स्वतःच्या मोबाइलवरून मतदान कार्डला कागदपत्रे जोडता येतात. नागरिकांनी जास्तीतजास्त लिंकिंग करण्याचे आवाहन निवडणूक शाखेच्या वतीने केले आहे

आजतागायत फक्त ३९.४९ टक्के आधार लिंकिंगचे काम पूर्ण झाले आहे. लोकांना याची माहिती व्हावी म्हणून प्रशासनाकडून वेळोवेळी शिबिरे घेतली जात आहेत. मतदान प्रक्रियेत पारदर्शकता असावी यासाठी इतर योजनांप्रमाणे मतदान ओळखपत्रही आधार लिंकला लिंक करण्याचे आवहन केले आहे.

# गुटखा खाऊन घाण करण्यावरून मारहाण

सुराज्य/सोलापूर

सिध्देश्वर पेठेतील स्पेक्टर एपेक्स अपार्टमेंटमधील कार्यालय उघडण्यासाठी गेल्यावर पायरीवर आकाश गवळी हा त्या ठिकाणी गुटखा खाऊन घाण करीत होता. त्यावर रावसाहेब मल्लिकार्जुन कारकले (रा. शुक्रवार पेठ) यांनी गवळीला जाब विचारल्यावर त्याने शिवीगाळ केली. त्यानंतर लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. गाडीसह ढकलून देऊन जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली. कारकले हे गाडीसह पडल्याने त्यांना पायाला दुखापत झाली. या प्रकरणी रावसाहेब कारकले यांनी फौजदार चावडी पोलिसांत फिर्याद दिली. पोलिस नाईक मुलाणी तपास करीत आहेत.

### डी मार्ट समोरून रिक्षा पळवली

डी मार्ट समोर येते पार्क करून ठेवलेली रिक्षा क्रमांक एम. एच. १३. जी. ९१५९ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली. ही घटना दि. १२ रोजी घडली. याप्रकरणी इम्रान उस्मानसाहब अत्तार (वय-३७, रा. राहुल गांधी झोपडपट्टी, मुस्लिम पाच्छापेठ) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे तपास पोलीस नाईक कांबळे हे करीत आहे.

### अपघातामधील जखमीचा मृत्यू

पांगरी (ता. बार्शी) येथे अनोळखी वाहनाच्या धडकेत जखमी झालेले रामा हरिबा गायकवाड (वय ५५ रा. पांगरी) हे सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना आज शनिवारी सकाळी मरण पावले. ६ ऑक्टोबर रोजी पहाटेच्या सुमारास पायी जाताना हा अपघात घडला होता. त्यांना उस्मानाबाद येथे प्राथमिक उपचार करून शुभम (मुलगा) यांनी सोलापुरात दाखल केले होते. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# कायम सेवेस मान्यता दिलेल्या १३१ पैकी एका रोजंदारी कामगाराचे निधन

सुराज्य/सोलापूर

महापालिकेच्या १३१ रोजंदारी कामगारांच्या कायम प्रस्तावास मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिल्याने महापालिका कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण होते. दरम्यान, दुसरीकडे त्यापैकीच एका रोजंदारी सफाई कामगाराचे अल्प आजाराने शनिवारी सकाळी निधन झाल्याची दुःखद घटना घडली. २५ वर्षे रोजंदारी सेवक म्हणून काम करूनही कायम होण्याच्या सुखाच्या क्षणीच निधन झाल्याने महापालिका कर्मचारी वर्गात हळहळ व्यक्त होत आहे.



महादेव दिगंबर जेटीथोर (वय ५० वर्ष, राहणार मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर, न्यू बुधवार पेठ सोलापूर) असे निधन झालेल्या रोजंदारी सफाई बिगारी कामगाराचे नाव आहे. मान्यता मिळाल्यावर अवघ्या दोनच दिवसानंतर शनिवारी सकाळी त्या १३१ रोजंदारी सेवकांपैकी महादेव दिगंबर जेटीथोर या सफाई कामगाराचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. महापालिकेच्या मंडई विभागात ते सफाई बिगारी कामगार म्हणून कार्यरत होते. कारंबा नाका स्मशानभूमी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### कायम कर्मचारी म्हणूनच मयताच्या कुटुंबास लाभ द्यावा : जानराव

राज्य शासनाच्या नगर विकास खात्याने महापालिकेतील १३१ सफाई बिगारी यांच्या यादीस आकृतीबंधानुसार मान्यता दिली आहे. नुकतीच मुख्यमंत्र्यांनी त्या प्रस्तावावर स्वाक्षरी केली. आकृतीबंध मंजुरीची तारीख गृहीत धरून मयत सेवकाच्या कुटुंबीयांच्या वारसास सर्व लाभ द्यावा अशी मागणी महापालिका कामगार संघटना कृती समितीचे अध्यक्ष कामगार नेते अशोक जानराव यांनी केली आहे.

# सोलापुरातून 'आप'चे कार्यकर्ते सायकलवर गुजरातला रवाना

सुराज्य/सोलापूर

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची २६ ऑक्टोबर रोजी गुजरातला सभा होत आहे. या सभेसाठी सोलापूर शहातून दोन आपचे कार्यकर्ते सायलकवर गुजरातला रवाना झाले आहेत. दररोज शंभर किलो मिटर या प्रमाणे दहा दिवसात तब्बल १ हजार २०० किलो मिटर प्रवास करत मुख्यमंत्री केजरीवाल यांच्या सभेला हजेरी लावणार आहेत

बाबासाहेब चव्हाण आणि निलेश संगेपाग अशी त्या कार्यकर्त्यांची नावे आहेत. पंजाब प्रमाणे गुजरात मध्ये देखिल चमात्कार करण्याचा मानोदय आप ने व्यक्त केला आहे. गुजरात सह संपूर्ण राज्यात भाजपाचे महागाईचे, बेरोजागारीचे सरकार आहे. हे सरकार जाऊन आप पार्टीची सत्ता यावी यासाठी गुजरातला आम्ही सायकलवर जातत असल्याचे सांगत तसे साकडे मुख्यमंत्री केजरीवाल यांची सभा झाल्यानंतर सोमनाथाचे दर्शन घेऊन



साकडे घालणार असल्याचा त्यांचा संकल्प आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या भावना या सायकलवर जाऊन मुख्यमंत्री केजरीवाल यांच्या कानावर घालणार आहेत. तब्बल १ हजार २०० किलोमीटरचा सायकल प्रवास करत दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या २६ तारखेला होणाऱ्या सभेला हजेरी लावणार आहेत. शनिवार पासून आम्ही गुजरातला सायकलवर निघाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आभिवादन करून त्यांनी गुजरातला कुच केले आहे. पुढील दहा दिवसांमध्ये दररोज १०० किलोमीटर प्रमाणे बाराशे किलोमीटरचे अंतर पार करत गुजरातला पोहचणार आहेत. सोमनाथांनी राजा प्रजापतींना शापातून मुक्त केले होते त्याप्रमाणे आम्ही सोमनाथाकडे देशातील जनता महागाई आणि बेरोजगारीतून मुक्त व्हावी आणि आम आदमी पार्टीचे सरकार गुजरातसह देशभरात सत्तेत येण्याचे साकडे घालणार असल्याचा मानेदय दोंघानी व्यक्त केला. यापुर्वी निलेश संगेपाग यांनी सोलापूर ते दिल्ली सायकल प्रवास करत मुख्यमंत्री केजरीवाल यांची भेट घेतली होती. त्यावेळी मुख्यमंत्री केरजरीवाल यांनी संगेपाग यांचे स्वागत केले होते.

# दत्त चौंक येथे वृत्तपत्र विक्रेता दिन उत्साहात

सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहर वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळाच्यावतीने दत्त चौक येथे वृत्तपत्र विक्रेता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून दै. सुराज्यचे व्यवस्थापक पुरूषोत्तम मित्रगोत्री, रमेश तावडे, नैशाद शेख, संजय भंडारे, अजय शिंदे, शिवकुमार क्यातमवार, यांच्या हस्ते माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम याच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी सर्व विक्रेते बांधवाना पढे वाटण्यात आले. याप्रसंगी वृत्तपत्र विक्रेते अनिल सोमा, दशरथ मोने, सिध्दाराम अटवथ, नरेश दौता, वसिम बागवान, ज्ञानेश्वर बनसोडे 'प्रकाश महालिंगपूर चंद्रकांत येमूल, रविंद्र गवळी, गोपाळ राहुल, गोपाळ दोंता, प्रभाकर भंडारी,



देविदास मिठ्ठा, पांडु संत, नितीन मोने, अशोक संत, चंदु वंगारी, रणजीत लोखंडे, राजेश श्रीमल, अशोक बुरा, मधुकर मोने, अंबादास आडम, व्यंकटेश बोगा, प्रशांत वनमुरगी, श्रीनिवास बोगा, नागेश इटकल, श्रीनिवास सावंत, शशिकांत जंगम, सोमनाथ चट्टे, तम्मेवार, जामदास आदी उपस्थित होते.



# ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

## शाळा कारखान्यावर तर मुले मात्र उसाच्या फडात



सुराज्य/अक्कलकोट

ऊसतोड कामगारांच्या मुलांची शिक्षणाची सोय व्हावी म्हणून सरकारने साखर शाळेची निर्मिती केली. परंतु महाराष्ट्रातील बहुसंख्य साखर शाळा या साखर कारखानास्थळावर पहायला मिळतात, तर अनेक साखर शाळा या बंद पडल्याने सध्या साखर शाळा कारखान्यावर तर ऊसतोड कामगारांची मुले मात्र ऊसाच्या फडात असल्याचे चित्र सध्या पहायला मिळत आहे. यामुळे ऊसतोड कामगारांच्या मुलांचे शिक्षणाचे प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आल्याचे दिसून येत आहे.

यंदाचा ऊस गळीत हंगाम कार्यक्रम १५ ऑक्टोबर पासुन सुरु होणार असल्याने सध्या तालुक्यात ऊस तोड कामगारांच्या ट्रॅक्टर, बैलगाड्यांची लगबग पहायला मिळत आहे. तर ऊसतोड कामगारांच्या टोळ्या सध्या शेत शिवारात स्थिरावताना पहायला मिळत आहे. या ऊस तोड कामगारा बरोबर अनेक लहान मुले पहायला मिळतात. ही मुले कुठल्याही शाळेत न जाता दिवसभर रानोरानी भटकंती करत पाळीव प्राण्यांचे संगोपन करताना दिसतात. या मुलांसाठी शासनाने खास करुन साखर शाळा सुरु केल्या आहेत. परंतु या साखर शाळेत फक्त बोटावर मोजणे इतपतच मुले शाळेत शिकताना दिसतात. बहुसंख्य साखर शाळा या कारखानास्थळावरच पहायला मिळतात, तर अनेक साखर शाळा या बंद असल्याचे पहावयास मिळतात. स्थलांतरित होऊन शेत शिवारातील ऊस तोड कामगारांच्या झोपडीतील मुलांना या साखर शाळेचा काहीच उपयोग होताना दिसून येत नाही. शक्यतो साखर शाळा या ऊस तोड कामगारांच्या झोपड्यांच्या आसपास असायला हवे, परंतु असे होताना मात्र दिसत नाही यामुळेच आज ही ऊस तोड कामगारांची असंख्य मुले ही शालाबाह्य राहताना दिसतात. त्यामुळे या मुलांची शैक्षणिक गुणवत्ता पूर्णपणे ढासळलेली पहायला मिळते. या ऊस तोड कामगारांच्या मुलांच्या या ज्वलंत शैक्षणिक प्रश्नाकडे शासन ही फारसे गांभीर्याने पाहिले जात नाही. यामुळे विद्यार्थ्यांकडे गुणवत्ता आढळून येत नसल्याने ही मुले शैक्षणिकदृष्ट्या मागास राहतात आणि हळूहळू शिक्षणाच्या प्रवाहातून हे विद्यार्थी बाजूला फेकले जात आहेत.

### निवासी शाळा उभारण्याचा निर्णय कागदावरच

उसतोड कामगारांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून महाविकास आघाडी सरकारने उसतोड कामगार महामंडळाच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी निवासी शाळा उभारण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले होते. परंतु अद्याप ही हा निर्णय कागदावरच असल्याचे पहायला मिळत आहे.



## किशोर-किशोरी स्पधेसाठी शेख व मांडवे यांची निवड

सुराज्य/वेळापूर : रत्नागिरी येथे १६ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या किशोर-किशोरी राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेसाठी वेळापूर येथील इंग्लिश स्कूल वेळापूर या शाळेचा किशोरमध्ये अकबर शेख कर्णधारपदी तसेच इंग्लिश स्कूल वेळापूरची किशोरी कुमारी अश्विनी मांडवेची कर्णधारपदी निवड झाली आहे. तसेच इंग्लिश स्कूलचे किशोर सिध्दार्थ माने देशमुख, सुहान आतार, समर्थ जाधव, ओम लांडे, आदित्य शिंदे, भैरव धांडोरे, तसेच किशोरी मध्ये प्राजक्ता बनसोडे, अंजना संजय मंडले, अंजना लक्ष्मण मंडले, वैष्णवी कुदळे, अंकिता लोखंडे, अनुष्का पवार आदींची राज्यस्तरीय स्पर्धे साठी निवड झाली आहे. निवड झालेल्या खेळाडूंना इंग्लिश स्कूल वेळापूरचे मुख्याध्यापक आर. बी. पवार, शिवाजी जाधव, सतीश कदम, सोमनाथ बनसोडे, जावेद मुलाणी, जावेद आतार या सर्वांचे मार्गदर्शन लाभले. सर्वांचे दलित मित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुभाष कदम, संस्थेच्या मार्गदर्शिका डॉ. मीना कदम, संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुजित कदम, उपप्राचार्य तेजस्विनी कदम महाडिक, संस्थेच्या सचिवा प्रियदर्शनी महाडिक, स्कूल कमिटी चेअरमन प्रतापराव पाटील, रिपाइं माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, मुख्याध्यापक आर. बी. पवार, उपमुख्याध्यापक सुनील खंदारे, पर्यवेक्षक शिवशरण पठान भास्कर बागल, यांनी अभिनंदन केले आहे.




## विवेकवर्धिनी विद्यालय येथे डॉ. कलाम यांना अभिवादन

सुराज्य/सोलापूर : दादासाहेब सोमदळे शिक्षण प्रसारक मंडळ पंढरपूर संचलित विवेक वर्धिनी व कनिष्ठ महाविद्यालयात भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. ज्युनिअर विभाग प्रमुख श्री. उत्तरेश्वर मुंढे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. डॉ कलाम यांचा जन्म दिन वाचन प्रेरणा दिवस म्हणूनही प्रशालेत व कनिष्ठ महाविद्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी प्रशालेचे प्राचार्य राजेंद्र पाराध्ये, उपमुख्याध्यापक तुकाराम कौलगे, पर्यवेक्षक सुनील पाटील, विभाग प्रमुख संजय पवार, बाबसाहेब सिरसट, नितीन कदम, बाळासाहेब करपे रूपाली भुसे, राजूभाई मुलाणी, युवराज परचंडे, बबन कोकतरे, दिलीप रानगट्टे, मगण सुळे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थितीत होते.

## हिरा गुंजले यास एक वर्षासाठी स्थानबध्दतेचे आदेश

सुराज्य/अक्कलकोट : अक्कलकोट शहरातील सराईत गुंड हिरा उर्फ पुरुषोत्तम मल्लिकार्जुन उर्फ मल्लुण्णा गुंजले (वय ३५) याच्यावर एमपीडीए अंतर्गत एक वर्षासाठी पुणे येथील येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. जवळ शस्त्र बाळगणे,



खुनाचा प्रयत्न करणे, शिवीगाळ, मारहाण, जिवे मारण्याची धमकी देणे आदी स्वरुपाचे गुन्हे आरोपी गुंजल याच्यावर अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात दाखल आहेत. त्याच्यावर एमपीडीए अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्याकडे सादर करण्यात आला होता. पोलीस अधीक्षकांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे कारवाईचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानंतर जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी त्याच्यावर कारवाईचे आदेश दिले होते. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत पुजारी व त्यांच्या पथकांनी गुंजले यास एक वर्षासाठी स्थानबध्द करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौर, पोलीस निरीक्षक प्रदीप काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

## विविध कामासंदर्भात आ. रणजितसिंहांचा पाठपुरावा सुरू

सुराज्य/अकलूज

माळशिरस तालुक्यातील ५७ गावात सिमेंट बंधारे बांधण्यासाठी ६ कोटी ८४ लाखांचा निधी मिळावा, गणेशगाव येथील निरेवरील कोल्हापुरी बंधारा दुरुस्त व्हावा, निरा देवघर धरण प्रकल्पाची कामे लवकर मार्गी लागावीत, जांभूड ते नीरा कालव्यावरील ७७ मैलाची उपसा सिंचन योजने संदर्भात बैठक लावावी, खुडूस येथे ७७ मैलातील चौकीजवळ निरा कालव्यावर पूल बांधण्यात यावा. बाभूळगावला पाणीपुरवठा योजना राबवण्यासाठी जलसंपदा विभागाची जमीन मिळावी. यासंदर्भात आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा सुरू केला आहे.

माळशिरस तालुक्यात गणेशगाव येथे निरा नदीवर सन १९९२ साली कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा बांधण्यात आला आहे या बंधाऱ्याची तळपातळीची उंची दीड मीटरने उचलणे आवश्यक आहे व बर्गे टाकण्यासाठी पिलर काँक्रीटचे करण्यात यावेत, येथे नवीन



१२५ बर्गे उपलब्ध व्हावेत, खंडाळा फलटण व माळशिरस तालुक्यातील कालव्याची कामे अद्याप झालेली नाहीत या प्रलंबित कामांना आगामी अर्थसंकल्पात निधी मंजूर करावा, जांभूड येथील कोल्हापुरी पध्दतीच्या बंधाऱ्यातून उपसा सिंचन योजनेने पाणी उचलून ते निरा उजवा कालव्याच्या ७७ मैलात टाकण्यासाठी उपसा सिंचन योजना पूर्णत्वास जाणे आवश्यक आहे. त्यासाठी नव्याने बैठकीचे आयोजन करावे, माळशिरस तालुक्यात ५७ ठिकाणी ६ कोटी ८४ लाख रुपये खर्चून सिमेंट बंधारे बांधण्यासाठीही मंजुरी मिळावी, यामधील ३४बंधारे हे लघु पाटबंधारे विभागामार्फत व २३ बंधारे हे विजयगंगा जलसंवर्धन प्रकल्प अंतर्गत बांधण्यात यावे,

खुडूस येथे ७७ मैला जवळ निरा उजवा कालव्यावर फुल बांधण्यात यावा, बाभुळगाव येथे १९७२ साली भीमा नदीवरून उपसा सिंचन योजना बंद अवस्थेत आहे. या योजनेसाठी वापरात असलेली पाच गुंठे जागा बाभुळगाव येथील पाणीपुरवठा योजनेस मिळावी आदी मागण्या आ. रणजितसिंहांनी केल्या आहेत.

### माढ्यात न्यायाधीश निवासस्थान होण्यास प्रयत्नशील

माढा येथे चार न्यायाधीश यांचे निवासस्थान बांधण्यासाठीचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहे यास मंजुरी मिळून आर्थिक तरतूद व्हावी, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळातर्फे शेतकऱ्यांसाठी ट्रॅक्टर व्याज अनुदान योजना मंजूर व्हावी. तसेच रोपळे येथे ३३-११ केव्हीचे विद्युत उपकेंद्र मंजुरीसाठी आपला पाठपुरावा सुरू असल्याचे आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी सांगितले.



## मल्लिकार्जुन हायस्कूल, रखमाबाई हत्तुरे महाविद्यालाय आदर्श शाळा पुरस्कार

सुराज्य/सोलापूर : हत्तुरे नगर येथील श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालयास सोलापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या वतीने जिल्हास्तरीय आदर्श शाळा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार प्रदान सोहळा कार्यक्रम हुतात्मा स्मृती मंदिर येथे संपन्न झाला. शिक्षण उपसंचालक विकास गरड यांच्या हस्ते व शिक्षणाधिकारी भास्करराव बाबर मा डॉ. किरण लोहार, सुभाष माने, तानाजी माने यांच्या उपस्थितीत मुख्याध्यापक तथा प्राचार्य वैजीनाथ हत्तुरे यांना सन्मानित करण्यात आले. प्रशालेत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची दखल घेत मुख्याध्यापक संघाने उपक्रमाची दखल घेत जिल्हास्तरीय आदर्श शाळा पुरस्कार घोषित केला. संस्थापक आप्पासाहेब हत्तुरे, संस्थेचे अध्यक्ष सिध्दप्पा वरनाळ, संस्थेचे सचिव नागनाथ सिंदगी यांनी प्रशालेचे मुख्याध्यापक वैजीनाथ हत्तुरे, धरेप्पा हत्तुरे, पर्यवेक्षक गिरमला बिराजदार, शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

## दर्शनाळ येथे कोयत्याने मारहाण; वडील जखमी

सुराज्य/सोलापूर : दर्शनाळ (ता.अक्कलकोट) येथे पैशाच्या वादातून कोयत्याने केलेल्या मारहाणीत यासीन नवाज चौधरी (वय ६९ रा.दर्शनाळ) हे जखमी झाले. काल शुक्रवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास त्यांचा मुलगा असिफ याने मारहाण केली होती. डाव्या हातात जखम झाल्याने त्यांना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून राहुल सराटे (शेजारी) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

### दुचाकीचा अपघात

तुळजापूर मार्गावरील उळेगाव जवळ दोन मोटरसायकल यांची समसमोर धडक झाल्याने एका दुचाकीवरील दोघे जखमी झाले. हा अपघात शनिवारी दुपारच्या सुमारास घडला. प्रवीण गोरख जाधव (वय ३० रा.कासेगाव ता.द.सोलापूर) आणि दत्ता बर्डे अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले आहे.



## शिवबा काशिद समाधीस्थळाच्या सुशोभिकरणासाठी १० लाखांचा निधी

सुराज्य/वेळापूर : वीर शिवबा काशिद समाधीस्थळाच्या सुशोभिकरणासाठी खा. अमोल कोल्हे यांनी दहा लाखांचा निधी जाहीर केला आहे. गोरेगाव(मुंबई) येथे खासदार डॉ. अमोल कोल्हे व राष्ट्रीय नाभिक युवक संघटनेच्या शिष्टमंडळा सोबत झालेल्या बैठकीत त्यांनी हा निर्णय जाहीर केला. पाऊसामुळे दरवर्षी समाधीची पडझड होत असते. त्यामुळे समाधी स्थळाच्या सुशोभिकरणाच्या बाबत निधी द्यावा अशी मागणी उपस्थित बांधवांनी केली होती. या बैठकीतच खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी स्वीय सहायक यांच्याशी चर्चा करून १० लाख रु. निधी समाधी स्थळाच्या सुशोभिकरणासाठी म निधी दिला. याबाबतचे पत्र खासदार कोल्हे यांनी जिल्हा नियोजन अधिकारी, कोल्हापूर यांना दिले आहे. सदर बैठक प्रसिध्द मेकअप अर्टीस्ट अमर झेंडे यांनी केले होती. या शिष्टमंडळात राष्ट्रीय नाभिक युवक संघटनेचे प्रदेश युवक अध्यक्ष सुधिर गाडेकर, सोलापुर जिल्हा युवक अध्यक्ष किरण भांगे, माळशिरस तालुका युवक अध्यक्ष राहुल सराटे, पंढरपुर शहर युवक अध्यक्ष तुकाराम चव्हाण, पंढरपुर शहराचे नेते महेश माने, पंढरपुर दुकान चालक मालक संघटनेचे चेअरमन सोमनाथ खंडागळे आदी उपस्थित होते.

## परतीच्या पावसाचा धुमाकूळ, माळीनगरातील रस्ते-ओढे तुडुंब

सुराज्य/माळीनगर

परतीच्या पावसाने पुन्हा हजेरी लावल्याने शेतकरी पुन्हा चिंतेत सापडला आहे. खरिपासोबतच आता रब्बी हंगामदेखील या सततच्या पावसाने धोक्यात आला आहे. गेल्या चार दिवसापासून माळीनगर परिसरात जोरदार स्वरूपाचा परतीचा पाऊस सूरू आहे. पुन्हा परतीच्या पावसाने पुन्हा जोर धरल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

या पावसामुळे शेतात, रस्त्यातील खड्ड्यात पाणी साचल्याने परिसर जलमय झाला.ग्रामीण भागातही परतीच्या पावसानं चांगलाच धुमाकूळ घातला आहे. शुक्रवारी दुपारनंतर झालेल्या पावसाने सर्वसामान्यांची चांगलीच तारांबळ उडवली. दीड ते दोन तास सुरु असलेल्या पावसानं सगळीकडं पाणीच पाणी साचले आहे. निरा नदीतील पाणी पातळीत वाढ झाली आहे. रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतुकीवर मोठा परिणाम झाल्याचे पाहायला मिळाले. संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी महामार्गाच्या कामासाठी घेतलेल्या खड्ड्यात पाणीच पाणी झाले असून त्याला तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. आधीच रस्ता नाही, त्यात पाऊस अशी परिस्थिती निर्माण





झाली आहे,तसेच रस्त्यावर चिखल झाल्याने, विद्यार्थी व पालकांना निसरड्या रस्त्यावर वाहतूक करणे धोकादायक झाले आहे. परतीच्या पावसाने दुबार पीक घेण्यासाठी,पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी,हे पाणी दीर्घकाळ शेतकऱ्यांना रब्बी आणि उन्हाळी पिकांसाठी वापरता येत असले तरीही या पावसाने शेतकऱ्यांसह सर्वासामान्यही त्रासिक झाल्याचे चित्र परिसरात आहे.

## सुखदेव भिसे-पाटील यांच्या स्वखर्चातून वर्गखोल्या बांधकामाला सुरुवात

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यातील शावळ येथील जिल्हा परिषद शाळेत सुखदेव भिसे-पाटील यांच्या स्वखर्चातून वर्ग खोल्या बांधकामाला सुरुवात करण्यात आली आहे.



गेल्या अनेक दिवसांपासून वर्ग खोल्या कमी पडत असल्याने विद्यार्थ्यांना वर्गात बसणे मुश्किल झाले होते. अनेक वेळा प्रयत्न करुन ही शाळेला वर्ग खोल्या बांधून मिळत नव्हत्या. तेव्हा उद्योगपती सुखदेव भिसे-पाटील यांच्या समोर ठेवण्यात आला होता. त्यांनी दोनच महिन्यात शाळेला दोन वर्ग खोल्या भिसे-पाटील युवा मंचाच्या माध्यमातून स्वखर्चातून बांधून देणार असल्याचे सांगितले होते. त्याचे भूमिपूजन करण्यात आले. याही पूर्वी उद्योगपती सुखदेव भिसे-पाटील यांनी भिसे-पाटील युवा मंचाच्या माध्यमातून शावळ येथील शहिद जवान परमानंद माने यांच्या स्मारक वॉल कंपाऊंड व सुशोभीकरणाचे काम केले होते. सुखदेव भिसे-पाटील यांचे शावळ जिल्हा परिषद शाळा व संपूर्ण ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करुन आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी कुदसिया शेख, विस्तार अधिकारी हरिश गायकवाड, प्रा बसवंत गायकवाड, तडवळ शिवसेना विभाग प्रमुख संतोष रत्नाकर, शावळचे सरपंच दामगोंडे, उपसरपंच भीमा सुरवसे, मंजुनाथ भतगुणकी, गणेश पाटील, पुंडलिक पुजारी, शिवशरण, शिवानी फाऊंडेशन` परिवार, मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.

## नोटिसा बजावताच रमाई घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांचा प्रतिसाद

सुराज्य/सोलापूर

### शासनाकडून चालू वर्षात महापालिकेला मिळाले ४.३० कोटींचे अनुदान






रमाई घरकुल योजनेसाठी जुन्या यादीतील लाभार्थ्यांसाठी शासनाकडून या चालू वर्षात दोन टप्प्यात एकूण ४ कोटी ३० लाख २७ हजार ५०० रुपये अनुदान महापालिका प्रशासनाकडे प्राप्त झाले. दरम्यान, पहिला हप्ता न घेतलेल्या जुन्या २०९ पात्र लाभार्थ्यांना महापालिकेने नोटिसा धाडल्यानंतर त्यापैकी संबंधित लाभार्थ्यांनी प्रतिसाद दिला. आवश्यक कागदपत्रे पालिकेकडे सादर केली. यामुळे त्यांचे प्रलंबित घरकुल बांधकाम मार्गी लागले आहे.

राज्य शासनाच्या समाज कल्याण विभागांतर्गत रमाई आवास योजनेत सोलापूर शहरात एकूण ३ हजार ३५४ घरे मंजूर आहेत. त्यापैकी ११ वर्षात आत्तापर्यंत २ हजार ५१२ घराचे काम पूर्ण झाले आहे. एकूण १० कोटी १५ लाख ७४ हजार ३०५ रुपये अनुदान शिल्लक आहे. दरम्यान, रमाई घरकुल योजनेचा पहिल्या हप्त्याचे अनुदान न घेतलेल्या जुन्या पात्र लाभार्थ्यांना महापालिका नगर अभियंता विभाग प्रशासनाकडून नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. त्यास संबंधित लाभार्थ्यांनी प्रतिसाद दिला आणि महापालिकेत कागदपत्रासह धाव घेतली. यामुळे सुमारे २५ ते ३० प्रकरणे मार्गी लागले.

सोलापूर शहरात सन २०११ पासून महापालिकेच्या नगर अभियंता विभाग व युसिडी विभागाअंतर्गत ही योजना राबविण्यात येत आहे. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील लाभार्थ्यांना रमाई आवास योजना अस्तित्वात असून सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या ७० पेक्षा जास्त वसाहती असून जुने व नवीन पात्र यादी लाभार्थी यांची संख्या मोठी आहे. राज्याच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी शासनाकडून दिनांक १६ फेब्रुवारी २०२२ रोजी ३ कोटी रुपये तर दिनांक १९ मे २०२२ रोजी १ कोटी तीस लाख २७ हजार पाचशे रुपये असे एकूण या चालू वर्षात दोन टप्प्यात ४ कोटी ३० लाख २७ हजार ५०० रुपये अनुदान महापालिका प्रशासनाकडे प्राप्त झाले. १० कोटी १५ लाख ७४ हजार रुपये अनुदान शिल्लक आहे. ही घरकुल योजना लाभार्थ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून धावपळ दिसून येत आहे.

### ५०८ घरे आहेत प्रगतीपथावर

महापालिका प्रशासनाकडील दिनांक ३० ऑगस्ट २०२२ रोजीच्या माहितीनुसार सोलापूर शहरात रमाई आवास योजनेअंतर्गत एकूण ३ हजार ३५४ घरे मंजूर आहेत. त्यासाठी ८१ कोटी १४ लाख ७५ हजार रुपये अनुदान प्राप्त झाले. मंजूर घरांपैकी २ हजार ५१२ घरांचे काम पूर्ण झाले आहे. या घरांसाठी दुसरा व पहिला हप्ता घेतलेले घेतलेले असे ५०८ लाभार्थीआहेत. असे एकूण ५०८ घराचे बांधकाम हे प्रगतीपथावर आहे. ३३४ घरकुले प्रलंबित होती. दरम्यान सध्या तो आकडा ३२२ वर आला आहे.

# ‘वसुबारस’च्या पार्श्वभूमीवर सर्व जनावरांची तपासणी करणार : स्वामी

✔ सुराज्य/सोलापूर

**वसुबारसच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यातील सर्व जनावरांची तपासणी व लसीकरण पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती सीईओ स्वामी यांनी दिली.**



जिल्ह्यात जनावरांना लंपी रोगाची लागण झाल्यानंतर जिल्हा पशुसंवर्धन विभागाने वेगाने तपासणी मोहीम व लसीकरण मोहीम हाती घेऊन लंपीचा धोका कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.

आजअखेर १३२६ जनावरांना लंपीची लागण झाली असून ४७४ जनावरे बरी झालेली आहेत. एकूण ६२ जनावरांचा मृत्यू झाला असून ७९० जनावरे उपचाराखाली आहेत. मृत्यू झालेल्या ३१ जनावरांच्या पशुपालकांना नुकसान भरपाई देण्यात आली असून एकूण ८ लाख १५ हजार इतकी रक्कम मंजूर करण्यात आली. यामध्ये उत्तर सोलापूर ५, सांगोला ५, करमाळा ९, माळशिरस ८, पंढरपूर ३, माढा १ प्रत्येकी एक पशुपालकांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे. साखर कारखाने सुरू होत असून जिल्ह्याबाहेरील जनावरे या निमित्ताने सोलापूर जिल्ह्यात दाखल होणार आहेत.

### जिल्ह्यात आजअखेर ९३७ जणांना लसीकरण

आजअखेर ६ लाख ९८ हजार ११९ जनावरांना वेगाने लसीकरण करण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यात आजअखेर ९३७ लसीकरण पूर्ण झाले आहे. साखर कारखान्यांवर दाखल होणाऱ्या जनावरांना दिपावली वसुबारसच्या पार्श्वभूमीवर तपासणी व लसीकरणाची विशेष मोहीम सोलापूर जिल्ह्यात राबविण्यात येणार असून वसुबारस पर्यंत १०० टक्के लसीकरण करण्याचे नियोजन करण्यात आले जिल्ह्यात एकूण जनावरांना १३२६ जणांना लागण झाली आहे तसेच ४७४ जनावर बरी झाली असून आतापर्यंत जवळपास ६२ जनावरे मृत्यू पावले असून ७९० जनावर सध्या उपचार सुरू आहेत, अशी माहिती स्वामी यांनी दिली.

या पार्श्वभूमीवर साखर कारखान्यांनी त्यांच्या स्तरावर संपर्क अधिकारी नेमण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. कारखाना परिसरात नव्याने दाखल होणाऱ्या बैल व गाय वर्गीय जनावरांची माहिती तात्काळ



पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना देण्यात यावी असे आदेश दिले आहेत, अशी माहिती सीईओ स्वामी यांनी दिली. यावेळी डॉ. भास्कर पराडे सदस्य सचिव लंपी समिती, सहा. पशुसंवर्धन अधिकारी बोरकर उपस्थित होते.

# उत्तर पं. समितीमधील टेबल कायम रिकामे

## अधिकारी, विभागप्रमुख असतात गायब ; चौकशीची मागणी

✔ सुराज्य/उत्तर सोलापूर



**सभापती, उपसभापती, सदस्य व १२ ग्रामपंचायत सदस्यांचा कालावधी संपल्याने कारभार पाहण्यासाठी प्रशासक आहेत. जे प्रशासक म्हणून काम करत आहेत तेच जागेवर नसल्याने नेमके हे अधिकारी, विभाग प्रमुख कुठे आहेत याची चौकशी करण्याची मागणी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस तथा गुळवंचीचे उपसरपंच सागर राठोड, हरी शिंदे, सुधीर गोरे, सागर राठोड, प्रशांत चव्हाण, अनिल गायकवाड, सुनील सुरवसे, हरी भिसे यांनी केली आहे.**

उत्तर तालुक्यातील ३६ गावासाठीचे प्रशासन असणाऱ्या उत्तर तालुका पंचायत समिती शहरात आहे. प्रशासन व ग्रामपंचायत प्रशासनात साधारणपणे ० ते ४० किमीचा अंतर आहे. अनेकजण कोणत्या ना कोणत्या कामासाठी येतात. मात्र संबंधित विभाग प्रमुख टेबलावर दिसत नाहीत. चौकशी केली असता बाहेर गेलेत, मिटींगला गेलेत, अशी उडवाउडवीची उत्तरे मिळतात. त्यामुळे नागरिकांची कामे होत नाहीत.

सध्या पंचायत समितीवर प्रशासक आहेत. जे प्रशासक म्हणून काम करत आहेत ते जागेवर नसल्याने नेमके हे अधिकारी, विभाग प्रमुख कुठे आहेत, संबंधित टेबलावरील अधिकारी, त्यांचे हालचाल नोंदी, दौरे कुठे आहेत? याची सखोल चौकशी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी करावी, अशी मागणी वरील लोकांकडून केली आहे.



## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाईची मागणी

✔ **उत्तर सोलापूर :** परतीच्या पावसाने खरीप पिकासाहित, फळ पिके, भाजीपाला यांचे मोठे नुकसान झाले असून त्वरित नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी उत्तर तालुका शिवसेना (ठाकरे) गटाच्यावतीने उपजिल्हा प्रमुख विक्रांत काकडे, उत्तर तालुका प्रमुख संजय पौळ यांनी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, प्रांताधिकारी जाधव, तहसीलदार जयवंत पाटील यांना निवेदनाद्वारे केली आहे. परतीच्या पावसाचा फटका उत्तर सोलापूरला देखील बसला आहे.

अधिकाऱ्यांनी जागेवर व शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे करून त्वरित मदत करण्यात यावी, ज्यांचे पंचनामे करण्यात आले आहेत, अशा सर्वांना नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी अच्युतराव बाभळे, सचिन घोडके, प्रमुख प्रसाद नीळ, अजिंक्य देशमुख, राजेंद्र घाटे, विष्णु भोसले, सोहन जगताप, प्रशांत चव्हाण, अशोक भोसले उपस्थित होते.



## वक्तृत्व स्पर्धेत नेहा अत्तारचा प्रथम क्रमांक

✔ **सोलापूर :** मो. पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत आयडियल उर्दू हायस्कूलची नेहा अंजुम उमर फारूक अत्तार यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. या स्पर्धेत ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तिला सात हजार रुपयाची सायकल बक्षीस स्वरूपात देण्यात आली. तिला रिजवान करजगी यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थापक आबीद शेख, मुख्याध्यापक इरफान जनवाडकर यांनी तिला शुभेच्छा दिल्या. यावेळी मुख्याध्यापक ईरफान जनवाडकर, रिजवान करजगी व इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## कामगार कुटुंबातील महिलांसाठी बक्षीस वितरणाचे आयोजन

✔ **सोलापूर :** शांतीनगर येथील जीवनज्योती क्रीडा व शिक्षण प्रसारक मंडळ संचलित देवराज प्राथमिक शाळेत नवरात्र महोत्सवाचे औचित्य साधून हद्दवाढ भागातील कामगार कुटुंबातील महिलांसाठी विविध स्पर्धा राबविण्यात आल्या होत्या. त्याचे बक्षीस वितरण पोलीस उपनिरीक्षक संजीवनी व्हट्टे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापिका आशाराणी डोके, श्रीनाथ प्रशालेचे मुख्याध्यापक सातलिंग शटगार, संगमेश व्हट्टे उपस्थित होते. व्हट्टे म्हणाल्या की, ‘शाळा म्हणजे विद्यार्थ्यांना नुसत्या अभ्यासातील धडे शिकविण्यासाठी मर्यादित न राहता समाजविकासासाठी विवीध उपक्रम राबविणारे केंद्र व्हावेत. मुख्याध्यापक सातलिंग शटगार यांनी मनोगत व्यक्त करताना अशा उपक्रमांमुळे धर्म-संस्कृती जतन करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळत असल्याचे नमूद केले.’

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पाककृती, रांगोळी, मेहंदी, सुंदर घर, आदर्श गृहिणी आदी स्पर्धांमधील विजेत्यांना मानाची साडी, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी विश्वनाथ बिराजदार,वंदना लचमापुरे, मल्लिनाथ अचलेरकर, शशिकला सातपुते, ईलियास शेख, संतोष बिराजदार, स्मिताराणी चिवटे, प्रसाद साळुंखे, निश्चलदास म्हेत्रे, जयंत गायकवाड, मळसिध्द केवटे, प्रशांत यादव, विनोद माशाळे, स्वाती म्याकल, गिरीष शिंदे, बाबासाहेब बनसोडे, संतोष पवार, प्रफुल्लकुमार पाटील, महेश कुंभार, निता कटारे, गंगुबाई कुलकर्णी, चंद्रकला कांबळे, मल्लिनाथ कोळी, अशोक विजापुरे, संजयकुमार सुरवसे उपस्थित होते.सूत्रसंचालन पद्मसिंह व्हरडे यांनी तर आभार शंभूलिंग अकतनाळ यांनी मानले.

## पिसाळलेल्या कुत्र्यांचा मोहोळमध्ये धुमाकूळ

✔ **मोहोळ :** मोहोळ शहरात पिसाळलेल्या कुत्र्याने धुमाकूळ घातला असून चावा घेऊन १८ जणांना जखमी केले आहे. यामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मोहोळ शहरात पिसाळलेल्या कुत्र्याने जवळ जवळ १८ जणांना जखमी केले आहे. हा कुत्रा शुक्रवारी सकाळी मोहोळ शहरात चावा घेत सुटला. एस. टी. स्टँड परिसर, दत्त नगर, यशवंत नगर, आदर्श चौक अशा भागात त्याने अनेकांचा चावा घेऊन गंभीर जखमी केले. ही बातमी सोशल मीडियाच्या माध्यमातून मोहोळ शहरात वाऱ्यासारखी पसरल. या कुत्र्याने चावा घेऊन जखमी केलेल्या काही रुग्णांना मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून सोलापूर येथे पुढील उपचारासाठी हलवण्यात आले आहे. या घटनेमुळे मोहोळ शहरात घबराट पसरली असून मोहोळ नगर परिषद सतर्क झाली आहे. कर्मचाऱ्यांना या कुत्र्याचा बंदोबस्त करण्यासाठी पाचारण करण्यात आले. याबाबत कोणतीही यंत्रणा उपलब्ध नसताना मोहोळ नगर परिषदेच्या काही तरुण कर्मचाऱ्यांनी त्याचा पाठलाग करून त्याला ठार केले. यामुळे मोहोळ शहरातील नागरिकांचा जीव भांड्यात पडला आहे.

## तीन लाखांचे दागिने चोरट्याने केले लंपास

✔ **सुराज्य/सोलापूर :** घराला कुलूप लावून नातेवाईकांच्या घरी कार्यक्रमाला गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने घरातील सोन्याच्या दागिन्यांसह तीन लाख पाच हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना दि.१२ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर दरम्यान घडली. याप्रकरणी वसीम अ. सत्तार नदाफ (वय-३८, रा. शिवगंगा नगर भाग ३, हिंदुस्तान बेकरीच्या पाठीमागे) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी हे नातेवाईकांच्या घरी कार्यक्रम असल्याकारणाने घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. त्यावेळी अज्ञात चोरट्याने घराचे लॉक उघडून घरात प्रवेश करुन तीन लाख पाच हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले आहे, असे फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेचा पुढील तपास सहा. पोनि चौधरी हे करीत आहे.



## १३ जणांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया

✔ **सुराज्य/सोलापूर :** जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या मार्गदर्शनाने जिल्हा अंधत्व नियंत्रण समितीच्यावतीने जागतिक दृष्टी दिन निमित्ताने ग्रामीण रूग्णालय माढा येथे १३ जणांचे मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून जागतिक दृष्टी दिन साजरा करण्यात आला.

यावेळी जिल्हा नेत्र शल्यचिकित्सक डॉ. गणेश इंदूरकर, वैद्यकीय अधिक्षक डॉ. घोळवे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. थोरात उपस्थित होते. जिल्ह्यात ग्रामीण भागात माढा, पंढरपूर, सांगोला, अक्कलकोट येथे शासनाकडून मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया होतात. गेल्या सहा महिन्यात सर्व शासकीय व स्वयंसेवी संस्थांच्या हॉस्पिटलमध्ये एकूण ७६५८ मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्याचप्रमाणे नेत्र पेढ्यांकडून ४४ नेत्र संकलन व २७ नेत्ररोपण करण्यात आले. सर्वांनी आपल्या डोळ्याची तपासणी वर्षातून एकदा नेत्रतज्ज्ञांकडून करून घ्यावे, असा असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले यांनी केले.

# फळवणीच्या पुलासाठी २५ लाखांचा निधी मंजूर

## आ. राम सातपुते यांच्या प्रयत्नाला यश

✔ सुराज्य/पिलीव

**फळवणी येथे निरा उजवा कालव्यावर असलेल्या व बचेरी काळमवाडी या गावांना जोडणाऱ्या पुलाच्या कामासाठी २५ लाखांचा निधी मंजूर झाला आहे.**

माळशिरस तालुक्यातील फळवणी, काळमवाडी, बचेरी जोड रस्ता असून फळवणी गावातून निरा उजवा कॅनॉल गेला असून फळवणी गावात फळवणी ते काळमवाडी, शिंगोर्णी रस्ता असून निरा वाजवा कॅनॉलवर पूल नसल्याकारणाने गेली २५ ते ३० वर्षे काळमवाडी व त्या परिसरातील फळवणी येथे शाळेत येण्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांना, दूध उत्पादक शेतकऱ्यांना, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सुमारे आठ किमी अंतर जावे लागत होते. हा पूल गेली कित्येक वर्ष नसल्याने येथील नागरिकांना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागत होते. ही अडचण दूर करण्यासाठी सरपंच सचिन पाटील यांनी आमदार राम सातपुते यांना निवेदन देऊन हा प्रश्न मार्गी लावण्याची विनंती केली होती. अखेर माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आ. सातपुते यांनी फळवणी येथे निरा उजवा कालव्यावर असलेल्या व बचेरी काळमवाडी या गावांना जोडणाऱ्या पुलाच्या कामासाठी २५ लाख रुपये निधी मंजूर केला. यामुळे सर्व शेतकरी विद्यार्थी ग्रामस्थ यामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यापुढेही आमदार रणजितसिंह मोहिते पाटील आमदार राम सातपुते यांच्या माध्यमातून फळवणी गावाच्या विकासासाठी आणखी निधी मंजूर करून आणणार असल्याचे फळवणीचे सरपंच पाटील यांनी सांगितले.



## सोशल महाविद्यालयात पुस्तक प्रकाशन

✔ **सुराज्य/सोलापूर :** सोशल महाविद्यालयात उर्दू विभाग आयोजित डॉ. कॅप्टन गौस शेख संपादित पुस्तक शुआ-ए-अदबचा प्रकाशन भारतीय उर्दू विकास फौंडेशनचे अध्यक्ष सुल्तान अख्तर यांच्या हस्ते संपन्न झाला. अध्यस्थानी प्राचार्य डॉ. इ. जा. तांबोळी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय उर्दू विकास फौंडेशनचे सुल्तान अख्तर, डॉ. रइसा मिर्जा, डॉ. अस्मां खान, डॉ. अ. रहीम गढवाल, सिनेटर जे. के. मुल्ला उपस्थित होते.

# अभ्यासात अपयश आल्यास खचू नका : उदमले

✔ सुराज्य/सोलापूर

अपयश ही यशाची पहिली पायरी आहे. विद्यार्थ्यांनी क्रमिक पुस्तकांसह, इतर पुस्तकांचा अभ्यास करावा. अपयश आले म्हणून खचून न जाता जोमाने अभ्यास केल्यास यश नक्की मिळते, असे प्रतिपादन महसूल उपजिल्हाधिकारी विठ्ठल उदमले यांनी केले.

माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्यावतीने ‘वाचन प्रेरणा दिन’निमित्त आयोजित व्याख्यानात अध्यक्ष म्हणून उदमले बोलत होते. यावेळी तहसीलदार अंजली मरोड, जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव, प्रमुख वक्ते प्राचार्य हरिदास रणदिवे, लेखक ज्ञानेश्वर जाधव उपायुक्त भगत, ग्रंथालय निरीक्षक प्रमोद पाटील आदी उपस्थित होते.

स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी अभ्यासाच्या पुस्तकासोबत इतर पुस्तकांचा, ग्रंथही वाचावेत. कोणतेही पुस्तक वाचले तर त्यातून तुम्हांला तुमच्या जीवनात उपयोगी पडेल, असेच असेल. वाचन केल्यास मार्गक्रमण करण्यास प्रेरणा मिळते, अभ्यास करून अधिकारी होऊन राज्याच्या विकासात भर घालण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

निवृत्तीची चिंता न करता प्रत्येकांनी स्वत:ला कामात गुंतवून घेतल्यास आनंद मिळण्यास मदत होईल. स्वातंत्र्यवीर भगतसिंग यांना तुरुंगातही वाचनाची आवड होती. मृत्यूच्या शेवटच्या क्षणापर्यंत ते वाचन करीत होते. यामुळे प्रत्येकांनी आवर्जून वेळ काढून वाचन करावे, असे आवाहन हरिदास रणदिवे यांनी केले.

साहित्यिक समाजाला दिशा देण्याचे काम करतात. समाजाला मुख्य प्रवाहामध्ये आणण्यामध्ये ग्रंथांचे



मोठे योगदान आहे. वाचकांनी आपण काय वाचावे, हे ठरवावे. प्रत्येकांनी आत्मबळ वाढविणारे साहित्य वाचले पाहिजे, असे मत ज्ञानेश्वर जाधव यांनी व्यक्त केले

यावेळी उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते फीत कापून ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम आणि ग्रंथालय चळवळीचे रंगनाथन यांच्या प्रतिमांचे पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी केले तर आभार प्रमोद पाटील यांनी मानले.

# मराठा सेवासंघाचे मराठारत्न पुरस्कार जाहीर

## फाळके, पाटील, मुळे, हजारे, काटुळे पुरस्कारांचे मानकरी







✔ सुराज्य/सोलापूर

**मराठा सेवा संघाच्यावतीने प्रतिवर्षी देण्यात येणाऱ्या मराठारत्न पुरस्कारांची घोषणा झाली आहे. यंदाच्या पुरस्कारांचे रामचंद्र फाळके, ऋतुजा पाटील, दत्तात्रय मुळे, राजेंद्र हजारे, अरूण पाटील, प्रकाश काटुळे मानकरी आहेत. सोमवारी डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात पुरस्कार वितरण सोहळा सायंकाळी पाच वाजता होणार आहे.**

मराठा सेवासंघाच्या ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त समाजातील विविध क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या समाजबांधवांचा मराठारत्न पुरस्कार देऊन गौरव केला जातो. पुरस्कारप्राप्त समाजबांधवांच्या कार्याचा आदर्श घेऊन इतरांनी प्रेरणा घ्यावी, यासाठी हा गौरव सोहळा आयोजित केला जातो.

यंदा पुरस्काराचे हे तिसरे वर्ष आहे. कोरोना कालावधीत खंड पडलेली पुरस्कारांची परंपरा पुन्हा चालू केली आहे. सोमवार १७ ऑक्टोबर २०२२ रोजी सायंकाळी ५. वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. ह.भ.प. बद्रीनाथ तनपुरे महाराज यांच्या अध्यक्षतेखाली तर बार्शीच्या शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत वितरण सोहळा होणार आहे.

यंदाचे पुरस्कार अनिल रामचंद्र फाळके (राजस्तरीय शैक्षणिक पुरस्कार), ऋतुजा राजन पाटील (युवती पुरस्कार), दत्तात्रय संदिपान मुळे (उद्योजकता), राजेंद्र कुंडलिक हजारे (सहकार), अरूण परशुराम पाटील (सामाजिक), प्रकाश मधुसूदन काटुळे (क्रीडा) यांना जाहीर झाला आहे.

तरी या पुरस्कार वितरण सोहळ्यास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ बिग्रेड, डॉ. पंजाबराव देशमुख शिक्षक परिषद, वीर भगतसिंग विद्यार्थी परिषद, तानुबाई बिरजे पत्रकार कक्ष, वधुवर कक्षाच्यावतीने करण्यात आले आहे.

# थकीत वेतन देयके पारित करताना टक्केवारी घेतली

✔ **सुराज्य/सोलापूर : खासगी अनुदानित प्राथमिक शाळेतील वेतन पथक कार्यालयाने थकित वेतन देयके पारित केली आहेत. परंतु यासाठी टक्केवारी घेतली आहे. त्यामुळे या प्रकरणांची चौकशी करुन संबंधितावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी प्राथमिकचे शिक्षणाधिकारी डॉ. किरण लोहार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, अशी माहिती डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेचे प्रदेश सचिव सुनील चव्हाण यांनी गुरूवारी दिली.**

**संयुक्त कृती समितीकडून निवेदनाद्वारे शिक्षणाधिकारी यांच्याकडे तक्रार**

डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद, महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना, युवक शिक्षक कर्मचारी संघटना व अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघटना यांच्या संयुक्त कृती समितीच्यावतीने हे निवेदन देण्यात आले.

मागील दोन वर्षापासून पुरवणी बिल, वरिष्ठ वेतन श्रेणी फरक, निवड श्रेणी व वैद्यकीय बिले थकित होती. शासनाने कोरोना काळात राज्याची आर्थिक स्थिती बिघडल्यामुळे फक्त वेतन अदा करण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पुरवणी बिले थकित होती. मार्च २०२२ मध्ये थकीत वेतन देयके अदा करण्याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडून निधी प्राप्त झाला होता.

थकीत वेतन देयके मंजुरीसाठी वरिष्ठ कार्यालयास सादर करताना वेतन पथक कार्यालयाकडून मनमानी पद्धतीने व नियमबाह्य पद्धतीने देयके सादर करण्यात आली आहेत. थकीत वेतन देयके मंजुरीसाठी आर्थिक मागणी करण्यात आल्याच्या तक्रारी संघटनेकडे प्राप्त झाल्या आहेत. थकीत वेतन देयके पारित करताना प्रक्रिया पारदर्शीपणे राबविणे आवश्यक असताना टक्केवारी पद्धत राबवून प्रक्रिया राबवली.

# संक्षिप्त वृत्त...

## पाकिस्तान जगातील धोकादायक देश : बायडेन

**वॉशिंग्टन** : रशिया-युक्रेन यांच्यातील युद्धाचा संपूर्ण जगाने धसका घेतला आहे. या युद्धाची झळ संपूर्ण जगाला बसत आहे.

खनिज तेल तसेच अन्य महत्त्वाच्या वस्तूंच्या किमतीमध्ये वाढ होत आहे. याच युद्धाच्या संदर्भाने नाटोच्या फौजांची रशियाच्या लष्कराशी चकमक झाल्यास जगभरात विध्वंस होईल, असा इशारा रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी दिला आहे. असे असतानाच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी रशिया, चीन या देशांना फटकारले आहे. विशेष म्हणजे त्यांनी पाकिस्तावही कठोर टीका केली असून पाकिस्तान हा देश जगातील सर्वांत धोकादायक देशांपैकी एक आहे, असे मत व्यक्त केले आहे. ते लॉस एंजेलिसमध्ये (कॅलिफोर्निया) एका कार्यक्रमात बोलत होते. जगातील महाशक्ती असलेल्या अमेरिकेने पाकिस्तानला सर्वात धोकादायक देशांमधील एक देश असल्याचे म्हटल्यामुळे पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्यासाठी हा धक्का असल्याचे म्हटले जात आहे.

## नऊ महिन्यात १४ जणांचा समुद्रात बुडून मृत्यू

**पालघर** : वसईच्या किनाऱ्याला मागील अनेक वर्षांपासून वाळू माफियांचे ग्रहण लागले आहे. तालुक्यातील किनाऱ्यांवर प्रचंड प्रमाणात बेकायदा वाळूउपसा होत असून यामुळे किनाऱ्याला धोका निर्माण झाला आहे. वाळूउपशामुळे ठिकठिकाणी मोठे खड्डे पडत असून वाळूची धूप वेगाने होत असल्याने समुद्राची खोली काही ठिकाणी धोकादायक पद्धतीने वाढली आहे. त्यामुळे समुद्रात बुडून मृत्यू होण्याच्या घटनादेखील घडत आहेत.

मागील नऊ महिन्यांत तब्बल १४ जणांचा समुद्रात बुडून मृत्यू झाला आहे. वाळूउपशामुळे किनारा धोकादायक झाल्यानेचे हे मृत्यू झाल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. दुसरीकडे, किनाऱ्यावरील गावांनादेखील उपशामुळे धोका निर्माण झाला आहे.

## म्हणून मी एसटी कर्मचाऱ्यांना चोर म्हणतो : आंबेडकर

**यवतमाळ** : वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी एसटी महामंडळावर आणि कर्मचाऱ्यांवर गंभीर आरोप केला आहे. एसटी कर्मचारी स्वार्थी आहेत, असे वक्तव्य त्यांनी केले आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या विधानानंतर चर्चांना उधाण आले आहे.

पक्षबांधणीसाठी शुक्रवारी ॲड. आंबेडकर यवतमाळ येथे आले होते. मेळाव्यानंतर त्यांनी विश्रामभवन येथे वार्ताहरांशी सवांद साधला. त्यावेळी त्यांनी राज्यातील सध्या सुरू असलेले राजकारण आणि एसटी कर्मचाऱ्यांबाबत त्यांनी वक्तव्य केलं आहे. 'एसटी कर्मचाऱ्यांना पगारवाढ पाहिजे. मात्र, दुसरीकडे एसटीची चोरी होत आहे. याबद्दल हे एसटी कर्मचारी बोलत नाहीत,' असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. 'एसटी कर्मचारी स्वार्थी आहेत. स्वतःच्या पगाराबाबत ते विचार करतात. पण एसटीची लूट होत आहे. त्याबद्दल ते बोलत नाही. म्हणून ते लूटीच्या संदर्भात बोलत नसतील तर तेही या लुटीत सहभागी आहेत,' असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

## वैद्यकीय शिक्षण प्रवेश; दोन कोटींची फसवणूक

**मुंबई** : मुंबईतील शीव रुग्णालयात मुलाला वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश देण्याच्या नावाखाली ५९ वर्षीय व्यक्तीची दोन कोटी १४ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

या प्रकरणी तिघांविरोधात ट्रॉम्बे पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. दोन आरोपींनी शीव रुग्णालयात एमएसची (मास्टर्स ऑफ सर्जन) जागा मिळवून देण्याच्या बहाण्याने २८ लाखांची फसवणूक केली. त्यानंतर तिसऱ्या आरोपीने फसवणूक केलेल्या दोघांचा शोध घेऊन त्यांच्याकडून रक्कम मिळवून देतो, असे सांगत तक्रारदाराची आणखी एक कोटी ८६ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

## २१८ किलो गांजा पोलिसांच्या हाती; पाच आरोपींना अटक

**इंदापूर** : इंदापूर तालुक्यातील सरडेवाडी गावातील हद्दीमध्ये मोटारींतून विक्रीसाठी नेण्यात येत असलेला २१८ किलो गांजा पोलिसांनी पकडला आहे. शुक्रवारी पहाटेच्या सुमारास करण्यात आलेल्या या कारवाईत पोलिसांनी ८१ लाखांचा ऐवज जप्त करून पाच जणांना अटक केली आहे.

बारामती विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी गणेश इंगळे यांनी इंदापूर येथे पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. पोलिसांनी या प्रकरणी अमिर गुलाब मुलाणी (रा. मळद ता. बारामती), प्रकाश राजेंद्र हळदे (रा. सातव शाळेजवळ, बारामती. मुळ रा. मुखाई एस टी स्टँडजवळ ता. शिरूर), खंडू अश्रू परखड (रा. पावणेवाडी ता. बारामती. मुळ रा. लोणी पारवड वस्ती ता. जामखेड जि. अहमदनगर), रोहन उर्फ फलेसिंग काशीनाथ जगताप (रा. देसाई इस्टेट, क्रीडा संकुलमागे, बारामती) आणि सुरज भगवान कोकरे (रा. हनुमंतवाडी, पणदरे, ता. बारामती जि. पुणे) यांना अटक केली आहे.

# भारतीय महिला संघाने इतिहास घडवला

# लंका दहन करून सातव्यांदा आशिया कप जिंकला

सुराज्य/सिलहट

**रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली जे भारताच्या पुरुष संघाला जमले नाही ते हमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली महिला संघाने करून दाखवले. बांगलादेशमधील सिलहट आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदानावर झालेल्या महिलांच्या आशिया कप क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताने श्रीलंकेचा पराभव करुन विजेतेपद मिळवले. भारताने ही लढत ८ विकेटनी जिंकली.**

### भारताची आशिया कपमधील कामगिरी

२००४- भारताचा श्रीलंकेवर ५-० असा विजय
२००५-०६- भारताचा श्रीलंकेवर ९७ धावांनी विजय
२००६- भारताचा श्रीलंकेवर ८ विकेटनी विजय
२००८- भारताचा श्रीलंकेवर १७७ धावांनी विजय
२०१२- भारताचा पाकिस्तानवर १८ धावांनी विजय
२०१६- भारताचा पाकिस्तानवर १७ धावांनी विजय
२०१८- भारताचा बांगलादेशकडून ३ विकेटनी पराभव
२०२२- भारताचा श्रीलंकेवर ८ विकेटनी विजय




आशिया कप जिंकण्याची भारताची ही सातवी वेळ आहे. आतापर्यंत ८ वेळी ही स्पर्धा झाली आहे. २००४ साली भारताने प्रथम विजेतेपद मिळवले होते. तेव्हापासून २०१६ पर्यंत सलग सहा विजेतेपद टीम इंडियाने मिळवली होती. २०१८ मध्ये अंतिम सामन्यात भारताचा बांगलादेशने पराभव केला होता. आता पुन्हा एकदा श्रीलंकेचा पराभव करून भारताने आशिया कप जिंकला.

अंतिम सामन्यात श्रीलंकेने टॉस जिंकला आणि प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र भारताच्या गोलंदाजीसमोर श्रीलंकेची दाणादाण उडाली. २० षटकात त्यांना ९ बाद फक्त ६५ धावा करता आल्या. लंकेच्या फक्त दोघा फलंदाजांना दुहेरी धावसंख्या करता आली. भारताकडून रेणुका सिंगने ३ षटकात ५ धावा देत ३ विकेट घेतल्या. तर राजेश्वरी गायकवाड आणि स्नेह राणाने प्रत्येकी २ विकेट घेतल्या.

विजयासाठी फक्त ६६ धावांचे लक्ष्य घेऊन मैदानात आलेल्या भारतीय संघाला ३२ धावांवर पहिला धक्का बसला. शेफाली वर्मा ५ धावांवर बाद झाली तर जेमिमा रॉड्रिग्ज फक्त २ धावा करून माघारी परतली. यामुळे भारताची अवस्था २ बाद ३५ अशी झाली होती. त्यानंतर स्मृती मानधना आणि कर्णधार कौरने विजयाची औपचारिकता पूर्ण केली.

स्मृतीने २५ चेंडूत नाबाद ५१ धावा केल्या, यात ६ चौकार आणि ३ षटकारांचा समावेश होता. कौरने नाबाद ११ धावा केल्या.

# पुण्याच्या बसमध्ये प्रवाशांची आरडाओरड

सुराज्य/पुणे

**पुण्यातील एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. हा व्हिडिओ एका बसमधील आहे. एक प्रवासी बसमध्ये आरडाओरडा करताना दिसत आहे. मला वाचवा, चालक माझं अपहरण करत आहे, अशी आरडाओरड प्रवाशाकडून सुरू आहे. बस चालक उतरू देत नसल्यानं प्रवाशानं बोंबाबोंब केली. त्यावेळी बसमधील प्रवाशानं व्हिडिओ चित्रित केला. तो आता सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.**



पीएमपीएमएलच्या बसमध्ये हा प्रकार घडला. ही बस चिंचवडहून बालेवाडीला जात होती. दोन स्टॉपच्यामध्ये एका ठिकाणी बस थांबली. त्यावेळी एका प्रवाशानं दरवाजा उघडण्यास सांगितलं. त्यावर बसचा दरवाजा केवळ स्टॉपवरच थांबेल असं उत्तर चालकानं दिलं. त्यावरून दोघांमध्ये वाद सुरू झाला. हे प्रकरण पुढे शिवीगाळ करण्यापर्यंत पोहोचलं.

प्रवासी बस चालकाला शिवीगाळ करू लागला. डॅशबोर्डवर हात मारू लागला. बसमधील इतर प्रवाशांनी त्याला शांत राहण्यास सांगितलं. मात्र तो काही ऐकेना. त्यानं आरडाओरडा करण्यास सुरुवात केली. 'ओ वाचवा, बस चालक त्रास देतोय. उतरु देत नाही. चालक अपहरण करतोय,' अशी आरडाओरड प्रवाशानं केली. त्याचा आवाज ऐकून आसपासचे लोक बसजवळ गोळा झाले. यानंतर चालकानं बस सुरू केली आणि ती थेट स्टॉपवरच थांबवली.

### पुणेकरांचे टेन्शन वाढले

# सीएनजी पंप १ नोव्हेंबरपासून अनिश्चित काळासाठी बंद

सुराज्य/पुणे

**पुण्यात येत्या १ नोव्हेंबरपासून सीएनजी पंप बंद राहणार आहेत. सीएनजीच्या कमिशनमध्ये वाढ केली नसल्याने पंप बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्याच्या तयारीत आहेत. २० ऑक्टोबरला सीएनजी बंद करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र ऐन दिवाळीच्या मुहूर्तावर नागरिकांचे हाल होऊ नये म्हणून येत्या १ नोव्हेंबरला सीएनजी पंप बंद ठेवण्यात येणार आहेत.**

सीएनजी पंप ठेवण्याबाबत यापूर्वीही बंदची हाक देण्यात आली होती. देऊन हायवायवरील पंप ठेवले होते बंद. दरम्यान, पुण्यामध्ये जे एमएनजीएलचे पंप आहेत त्यांनी ६० पैसे वितरकांचे कमिशन वाढवले. मात्र टोरेन्स कंपनीने ते कमिशन अजूनही वाढवलेले नाही. यासाठी टोरेन्सचे जे डिलर आहेत त्यांनी बैठकीसाठी वेळ मागितला होता. पण टोरेन्सने अजूनही त्यांना बैठकीसाठी बोलवलेलं नाही. मात्र ऑइल कंपन्यांनी डीलर आणि टोरेन्स यांचा समन्वय घडवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.



जर यातून काही तोडगा निघाला तर संप मागे घेऊ शकतो. त्यासाठी वाटाघाटी आता सुरू होण्याच्या मार्गावर आहेत.

कंपनीने जर मागण्या केल्या नाही तर डीलर्सने बेमुदत संपावर जाण्याची भूमिका घेतलेली आहे, अशी माहिती पेट्रोल डिझेल असोसिएशनचे राष्ट्रीय प्रवक्ते अली दारूवाला यांनी दिली आहे. त्यामुळे आता ऐन दिवाळीत प्रवाशांचे हाल होण्याची शक्यता नाकारता येत नाहीये. पेट्रोल डिझेल महाग झाल्यानंतर पुण्यात आणि एकूणच राज्यात सीएनजी वरील वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे आणि अशा वेळी दिवाळीत जर सीएनजी पंप बंद राहिले तर नागरिकांचे मोठ्या प्रमाणात हाल होऊ शकतात.



सुराज्य/नागपूर

# आमदार रोखतात विकासकामे; गडकरींची लोकप्रतिनिधींवर टीका

**विकासकामे थांबविण्याचा नवीन ट्रेण्ड महाराष्ट्रात आला आहे. आपल्या राज्यातील काही खासदार, आमदार अशा संधी शोधत असतात. स्वतःच्या अधिकारांचा दुरुपयोग करून ते कामे थांबविवात. हा प्रकार योग्य नाही', अशी टीका केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी चिटणवीस सेंटर येथील 'मिनकॉन' परिषदेत केली.**

रोखठोक बोलण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या गडकरींनी शुक्रवारी वन आणि पर्यावरण विभाग, प्रशासनातील लालफितशाही तसेच लोकप्रतिनिधी म्हणून मंत्र्यांचे अपयश यांवर प्रहार केला. मंचावर उपस्थित राज्याचे वन तसेच सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना उद्देशून गडकरी म्हणाले, 'सुधीरभाऊ, वनविभागामुळे माझ्या विभागाचा रस्तादेखील बनणे मुश्किल होऊन बसले आहे. कालच मी नागपुरातील वनाधिकाऱ्यांना फोन केला तेव्हा त्यांच्याकडे विकासकामांशी संबंधित सतरा प्रकरणे प्रलंबित असल्याचे कळले. अशाप्रकारच्या अधिकाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई व्हायला हवी. त्यांना नोकरीहून काढून टाकायला हवे. त्याशिवाय असे अधिकारी सुधारणार नाहीत. अनेक अधिकाऱ्यांचे पत्नीपेक्षा फाइलवर अधिक प्रेम असते. ते फायली लपवून ठेवतात. अशा अधिकाऱ्यांमुळे विकास थांबला असून त्याला आपल्यासारखे लोकप्रतिनिधी जबाबदार आहेत.

'राज्य हे लोकप्रतिनिधींचे आहे. जनता अधिकाऱ्यांना नाही तर मंत्रिपदाची शपथ घेतलेल्यांना बोलणार आहेत. अभयारण्याच्या नावाखाली उमरेडमधील खाण बंद करून टाकली. जिथे कधीही वाघ आला नाही, तिथे सुरू असलेली खाण बंद करण्याचा धंदा वन विभागाने केला. एखादी खाण सुरू करताना भूसंपादनासाठी प्रचंड वेळ लागतो. भूसंपादन हे राज्याच्या अधिकारक्षेत्रात येते. विदर्भातील सक्षम मंत्री या नात्याने तुम्ही यासाठी पुढाकार घेऊन बैठक बोलवायला हवी. साध्या भूसंपादनात दीर्घकाळ जात असल्याने ब्लॅकमेलिंगचा प्रकार वाढला आहे. या प्रकारांमुळे आपण महाराष्ट्राचा विकास होऊ शकत नाहीये.'

## अन् कपडे काढून आरटीओ अधिकाऱ्याच्या मागे लागला

सुराज्य/सांगली

आरटीओ अधिकाऱ्याने लाच मागितल्यानंतर एकाने आरटीओ अधिकाऱ्यांना सळो की पळो करून सोडले. कडेगाव येथे हा प्रकार घडला असून याचा व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल झाला आहे. प्रमोद मांडवी हे आपली गाडी पासिंग करण्यासाठी कडेगाव आरटीओ कॅम्पमध्ये गेले होते. मात्र यावेळी मांडवी यांना त्यांची गाडी पासिंग करण्यासाठी लाच मागणीचा प्रकार घडला. गाडीचे सर्व कागदपत्रे रीतसर कायदेशीर असताना लाच कशासाठी द्यायची, यामुळे मांडवी हे चांगलेच संतापले. त्यानंतर त्यांनी स्वतःचे कपडे काढून लाच मागणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मागे कपडे घेण्यासाठी लागले. मांडवींच्या या गांधीगिरी स्टाईल आंदोलनामुळे लाच मागणारे अधिकाऱ्याची मात्र धाबे दणाणले होते.



## तुम्हांला जे जाती-धर्मात अडकवतात ते समाजातील मोठे गुंड : नाना पाटेकर

सुराज्य/सातारा : सद्‌गुरु गाडगेबाबा महाविद्यालय कराड येथे ४२ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. नाना पाटेकर यांनी या मेळाव्यात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जे तुम्हांला जाती धर्मांमध्ये अडकवतात ते समाजातील सर्वात मोठे गुंड आहेत, असे नाना म्हणाले.

## प्रा. साईबाबा यांना सर्वोच्च न्यायालयाचा झटका



**सुराज्य/नवी दिल्ली** : दिल्ली विद्यापीठातील प्रा. जी. एन. साईबाबा आणि त्यांच्या अन्य पाच सहकाऱ्यांची जन्मठेपेची शिक्षा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शुक्रवारी रद्द केली. मात्र, प्रा. साईबाबा व अन्य पाच जणांच्या सुटकेच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. त्यामुळे हा प्रा. जी. एन. साईबाबा व अन्य पाच जणांसाठी मोठा धक्का असल्याचे बोलले जाते. सर्वोच्च न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत त्यांची तुरुंगातून सुटका करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी ८ डिसेंबर रोजी होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिल्लीचे प्राध्यापक जी. एन. साईबाबा आणि अन्य पाच जणांची शिक्षा रद्द करुन त्यांची सुटका करण्याचे आदेश दिले होते. मात्र, कोर्टाच्या या निर्णयावर महाराष्ट्र सरकारने आक्षेप घेतला होता.

# राज्यातील बहुतांश जिल्ह्यात शालेय पोषण आहार बंद

सुराज्य/औरंगाबाद

**शासन व प्रशासनातील शालेय पोषण आहार निविदेच्या नस्तीच्या घोळामुळे गेल्या सहा महिन्यांपासून राज्यातील बहुतांश जिल्ह्यात शालेय पोषण आहार बंद पडला आहे.**

ऑक्टोबर-नोव्हेंबरसाठी जुन्या कंत्राटदारास ३२ दिवस धान्य पुरवठ्याचे आदेश दिले आहेत. अकोला जिल्ह्यात तर गेल्या दीड वर्षांपासून शालेय पोषण आहार मिळत नसल्याचे राज्याचे विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या विषयाच्या अनुषंगाने चर्चा केली आहे. एक सरकार पडून दुसरे येईपर्यंत नस्ती प्रवास संचालक, सचिव, मंत्री त्यानंतर उपमुख्यमंत्री आणि मुख्यमंत्री असा झाला. पण प्रश्न काही मिटला नाही. शालेय पोषण आहाराबरोबर मेळघाटात



वेळेवर अंडी पुरवठा होत नसल्याने राज्यातील कुपोषणाचे आकडे वाढत असल्याचा आरोप शिवसेना उद्धव ठाकरे गटाने केला आहे. राज्यातील बहुतांश जिल्ह्यात सध्या तांदूळ, वाटाणा यांसह विविध धान्य पुरवठा पूर्णत: बंद झाला आहे. प्रशासकीय पातळीवरून होणारा उशीर आणि शासन दरबारी विलंबाने होणाऱ्या निर्णयामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या पोषणावर विपरित परिणाम होऊ लागले आहेत.

कोरोना काळात विस्कळीत झालेल्या या योजनेकडे कोणीही लक्ष नेत नसल्याचे दिसून येत आहे. अलिकडेच अकोला दौऱ्यावर असताना राज्यातील पोषण आहाराचा प्रश्न गंभीर असल्याचे लक्षात आले. अकोला जिल्ह्यात दीड वर्षांपासून शालेय पोषण आहार मिळत नसल्याचे दिसून आल्यानंतर या प्रश्नी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशीही चर्चा झाली. शासकीय व प्रशासकीय अडचणींना दूर करण्याविषयी सकारात्मक चर्चा झाल्याचे अंबादास दानवे बोलताना सांगितले.

**एकदाच धान्य, अंडी देऊन उपयोग काय?**

शालेय पोषण आहार तसेच अंगणवाडीतील आहार देताना तीन महिन्याचे धान्य एकदाच देऊन उपयोग होत नसल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येते. मेळघाटात कुपोषित मुलांना अंडी दिली जातात. पण चार दिवसाला एकदाच अंडी दिल्याने ती मुलांना मिळतीलच, असे सांगता येत नाही. त्यामुळे योजनाही सुरू आणि कुपोषणही असे चित्र दिसून येत असल्याचेही निरीक्षण दानवे यांनी नोंदविले आहे.

# फडणवीस-बावनकुळेंच्या नागपूरमध्ये भाजपला धक्का

### पंचायत समिती सभापती निवडणुकीत सुपडा साफ

सुराज्य/नागपूर

**राज्यात सत्तांतर घडवून भाजपने काही महिन्यांपूर्वी महाविकास आघाडीला जोरदार धक्का दिला. मात्र याच भाजपचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नागपूर जिल्ह्यात मात्र काँग्रेसने जोरदार मुसंडी मारली आहे. जिल्ह्यातील १३ तालुक्यांच्या सभापतीपदाच्या निवडणुकीत भाजपला धोबीपछाड देत काँग्रेसने तब्बल ९ जागांवर विजय मिळवले आहे. भाजपला मात्र खातेही उघडता आले नाही.**

भाजप नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपूरचे पालकमंत्रीही आहेत. तसंच भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हेदेखील याच नागपूर जिल्ह्याचं प्रतिनिधित्व करतात. राज्य पातळीवरील दोन मोठ्या नेत्यांच्या जिल्ह्यात भाजपला पराभवाचा धक्का बसल्याने मोठी चर्चा रंगत आहे.



राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचा विधानसभा मतदारसंघ असलेल्या काटोल आणि नरखेड या तालुक्यांतील सभापतीपद राष्ट्रवादीकडे ठेवण्या यश मिळवले आहे. तसंच हिंगणा तालुक्यातील सभापतीपद निवडणुकीतही राष्ट्रवादींने बाजी मारली आहे. जिल्ह्यातील एका तालुक्याचं सभापतीपद मिळवण्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील बाळासाहेबांची शिवसेना हा पक्ष यशस्वी ठरला आहे. या पक्षाचे रामटेक तालुक्यातील आमदार आशिष जैसवाल यांनी तालुक्यातील सभापतीपद आपल्या पक्षाच्या उमेदवाराकडे खेचून आणलं आहे.




काय म्हणतयं? पॉलिटिक्स

# ‘इधर चला मैं उधर चला, जाने कहाँ मैं किधर चला?’

अजित उंब्रजकर

**सध्या राष्ट्रवादी जाण्याची सुरू असलेली चर्चा, अधून मधून शिंदे गटाच्या संपर्कात असल्याची चर्चा, आता आ. जयकुमार गोरे यांनी भाजपमध्ये येण्याचे दिलेले आमंत्रण यामुळेच आणि स्वत:च शिवसेनेत गेलो ही चूक झाल्याची दिलेली कबुली, पुढील अद्याप काही ठरले नसल्याचे सांगणे यामुळे ‘इधर चला मैं उधर चला, जाने कहाँ मैं किधर चला’ या कोई मिल गया चित्रपटातील नायकाप्रमाणे सध्या माजी आमदार दिलीप माने यांची राजकीय अवस्था झाल्याचे पाहायला मिळत आहे.**

चारच दिवसांपूर्वी सिद्धनाथ साखर कारखान्याचा गळीत हंगाम पार पडला. या कार्यक्रमाला माने यांनी गोरे यांना आमंत्रित केले होते. मात्र, या कार्यक्रमात मात्र गोरे यांनीच माने यांना भाजपमध्ये येण्याचे आमंत्रण दिले, हे विशेष. तेव्हापासूनच पुन्हा एकदा माने यांच्या पुढील राजकीय वाटचालीबद्दल चर्चा सुरू झाली. माने यांनी या कार्यक्रमात आपण २०१९ मध्ये शिवसेनेमध्ये गेलो ही चूक झाल्याची कबुली दिली तसेच यापुढे आपली राजकीय वाटचाल अद्याप ठरली नसल्याचे सांगितले. माने यांच्या कारकिर्दीसाठी महत्त्वाची असलेली महापालिका निवडणूक जवळ आली आहे. तरीही त्यांचा अद्याप पक्ष ठरला नसल्यामुळे त्यांचे समर्थक आणि कार्यकर्ते मात्र माने यांच्या या वक्तव्यामुळे संभ्रमात पडले आहेत.

२००९ मध्ये माने यांनी दक्षिण तालुका मतदारसंघात काँग्रेसकडून विजय मिळवला. या पाच वर्षाच्या काळात त्यांनी तालुक्यात अनेक विकास कामे केली मात्र तरीही २०१४ मध्ये त्यांना सुभाष देशमुख यांच्याकडून पराभव स्वीकारावा लागला. २०१४ पासून महाराष्ट्रसह देशात काँग्रेसची वाताहात झाली आणि मोदी लाट आली. त्यामुळे अनेक नेत्यांनी भाजप आणि त्याला पर्याय म्हणून शिवसेनेचा रस्ता धरला. त्यात माने यांनीही उडी घेतली. २०१९ मध्ये त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला मात्र त्यांना दक्षिण मतदार संघ सोडावा लागला. यावेळी त्यांनी आमदार प्रणिती शिंदे यांच्या विरोधात शहरमध्यचा पर्याय निवडला मात्र यावेळी ते ३२ हजार मते मिळवत तिसऱ्या क्रमांकावर गेले. त्यावेळेस त्यांना मध्य मध्ये आपली डाळ शिजणार नाही, हे कळून चुकले. त्याच दरम्यान दक्षिण मतदार संघात नवख्या बाबा मिस्त्री यांनी आ. देशमुख यांच्यापुढे तगडे आव्हान निर्माण केले. त्यामुळे या मतदारसंघात जर माने असले असते तर त्यांनी विजय मिळवला असता, असे अनेकांनी बोलूनही दाखवले होते. त्यामुळेच माने यांना शिवसेनेत जाण्याचा निर्णय चुकीचा वाटल्याचे जाणवले. त्यानंतरच्या काळात ते शिवसेनेपासून अलिप्त राहिले. याच काळात त्यांनी राष्ट्रवादीचे नेते शरद पवार आणि माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी संपर्क वाढवला. त्यामुळे माने राष्ट्रवादीमध्ये जाणार अशी चर्चा सुरू झाली.



अनेकांनी त्यांचा पक्षप्रवेशाचा मुहूर्तही काढला होता. तशा तारखा सोशल मीडियावर जाहीरही करण्यात आल्या. राष्ट्रवादीमध्ये जाऊन दक्षिण मतदार संघातून आगामी विधानसभा निवडणूक लढवायची अशी तयारीही त्यांनी सुरू केली होती. मात्र जून महिन्यामध्ये अनपेक्षित प्रमाणे राज्यात महाविकास आघाडीचे सरकार कोसळून शिंदे आणि फडणवीस यांचे सरकार आल्यामुळे सर्वांप्रमाणेच माने यांचे राजकीय गणित उलटे फिरले. त्यानंतर सत्तेत आलेल्या शिंदे गटाच्या संपर्कात माने आहेत. त्यांना राज्यपाल नियुक्त आमदारकी मिळेल, अशा वावड्या उठू लागल्या. एकीकडे राष्ट्रवादीचा प्रवेशही रखडला असल्यामुळे पुन्हा माने काहीतरी वेगळी भूमिका घेणार का? अशी चर्चा त्यांच्या समर्थक आणि कार्यकर्त्यांमध्ये सुरू झाली. अशातच आता सिद्धनाथ साखर कारखान्याच्या गाळपाप्रसंगी खटावचे भाजपचे आमदार जयकुमार गोरे यांनी भाजपमध्ये येण्याचे आमंत्रण दिले. माने यांनी हे खोडून न काढता उलट २०१९ मध्ये आपण शिवसेनेत जाऊन चूक केली हे तर त्यांनी मान्य केले मात्र आपले पुढील काही ठरले नाही, असे सांगून पुढील काळातील आपल्या राजकारणाबाबत त्यांनी गूढ निर्माण करून टाकले आहे.

### रिस्क नाही घेणार

माने हे जरी वेगवेगळ्या पक्षात जाणार अशी चर्चा उठत असली तरी काँग्रेसमध्ये मात्र ते पुन्हा जाणे शक्य नाही. आमदार प्रणिती शिंदे यांच्या विरोधात त्यांनी निवडणूक लढवली असल्यामुळे शिंदे आणि माने यांच्यात वितुष्ट आले आहे. अशा सध्या राज्यामध्ये काँग्रेसला म्हणावे तसे चांगले दिवस नाहीत. दक्षिण मधील काँग्रेसही विस्कळीत झाली आहे. त्यामुळे ते पुन्हा काँग्रेसमध्ये जाऊन रिस्क घेण्याची शक्यता कार्यकर्त्यांना कमी वाटत आहे.

### . . . तर दक्षिणमधून लढणार

माने यांनी महापालिका निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केल्यास त्यांना आगामी विधानसभा निवडणूक दक्षिण मतदार संघातूनच लढवावी लागणार आहे. या मतदारसंघातून त्यांनी एकदा विजय मिळवलेला आहे. २०१४ मध्ये ते याच मतदारसंघातून पराभूत झाले असले तरी आता सध्या त्यांनी या मतदारसंघातील महत्त्वाच्या असलेल्या शहरी भागावर आपले लक्ष केंद्रित केले आहे. याच भागात त्यांना मते कमी मिळतात. त्याच भागात त्यांनी आता विविध कार्यक्रम घेत आपला जनसंपर्क वाढवला आहे.

### मग ‘मध्य’शिवाय पर्याय नाही

माने यांनी ऐन वेळेस शिंदे गट अथवा भाजपचा रस्ता धरल्यास त्यांना शहर मध्य मधून निवडणूक लढल्याशिवाय कुठलाही पर्याय होणार नाही. सद्यस्थिती मधून दक्षिण मतदार संघातून सुभाष देशमुख हे प्रतिनिधित्व करत आहेत. २०२४ मध्ये हा मतदारसंघ त्यांच्याकडेच जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे माने यांना शहर मध्य मध्यचाच रस्ता धरावा लागणार आहे. या मतदारसंघातून गत वेळी त्यांचा पराभव झाला होता. त्यामुळे ते काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पुन:श्च हरिओम... वकीलसाहेब पुन्हा रिंगणात?

**सोलापूर लोकसभा मतदारसंघ हा अनुसूचित जातीसाठी राखीव आहे. या मतदार संघातून बनसोडे यांनी दोन वेळा निवडणूक लढवली. पहिल्या म्हणजे २००९ च्या निवडणुकीत त्यांना पराजय पत्करावा लागला परंतु दुसऱ्या टर्ममध्ये ते केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचा पराजय करून निवडून आले. ही गोष्ट भाजपाच्या व सोलापूर मतदार संघाच्या दृष्टीनेही साधी आणि सामान्य नव्हती, हे मान्य करावेच लागेल. तशा अर्थाने हा एक चमत्कारच होता. मात्र या चमत्कारापाठीमागे बनसोडे यांचे कष्ट आणि सर्वसामान्य कार्यकर्ता आणि मतदार यांच्याशी कुठलाही अभिनिवेष न ठेवता त्यांनी ठेवलेला संपर्क कारणीभूत होता. त्यामुळे सोलापूर लोकसभा मतदारसंघातून पुन्हा एकदा ॲड. शरद बनसोडे यांची गरज असल्याची भावना भाजपाच्याच कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहे.**

संजय आठवले

बनसोडे यांनी सावरकर विचार मंचच्या माध्यमातून जिल्हयात व मतदार संघात कार्यकर्त्यांचे जाळे तयार केले. माणसे जोडली. जनसंपर्क निर्माण केला. त्यामुळे ते विजयाजवळही पोहोचले. त्यांच्यासाठी तसा मतदार संघ नवखाच होता. आधी वकिली नंतर चित्रपटसृष्टी आणि मग राजकारण असा त्यांचा प्रवास होता. अशा परिस्थितीतही त्यांची नौका खासदारकीच्या पैलतिरी पोचली ती केवळ सर्वांशी संपर्क आणि थेट बोलणं यामुळे. तसे बघितले तर सोलापूर मतदारसंघ हा सुशीलकुमार शिंदे यांचा तसा बालेकिल्लाच, पण या किल्ल्याला कसा छेद गेला, हे त्यांना कळलेच नाही. शिंदे यांना मोहोळ विधानसभा मतदारसंघातून चांगली आघाडी मिळाली होती परंतु इतर ठिकाणी त्यांचे मताधिक्य घटले होते. मोदी लाट म्हणा किंवा काहीही म्हणा परंतु मतदारांनी बदल घडवला होता, हे मात्र नक्कीच.

बनसोडे हे त्यावेळी राजकारणात नवखे वाटत होते. परंतु त्यांनी ग्रामीण भागात चांगलाच संपर्क ठेवला होता. व्यक्तिगत कार्यकर्ता म्हणून त्यांना ओळखत जात होते. त्यांचा निधी ग्रामीण भागात खेड्या पाड्यात वाड्या वस्त्यावरच नव्हे तर अनगरच्या १२ वाड्यामध्येही पोचवला अन अनगरकरांशीही जवळीकही केली होती. परंतु पक्षाने त्यांना २०१९ डावलले. त्यांच्याऐवजी डॉ. जय सिध्देश्वर शिवाचार्य महाराज यांना उमेदवारी दिली. ते निवडूनही आले. खरे परंतु त्यांच्या जातीचा दाखला वादग्रस्त ठरला. यात मतदार अन कार्यकर्ते मतदार यांचाही गोंधळ उडाला आहे आणि ते महाराज असल्यामुळे म्हणावे तसे त्यांना आजही जनतेत मिसळता आले नाही अन कार्यकर्त्यांनाही त्यांच्या जवळ पोचता येईना, अशी अवस्था झाली आहे.

### मागास वर्गातील जनताही नाराज

या साऱ्या घडामोडीत मतदार तर नाराज झालाच परंतु मागास वर्गातील जनताही नाराज झाली मग बनसोडे कशात वाईट होते ? असा प्रश्न आज निर्माण होवू लागला आहे. परंतु बनसोडे जरी खासदार नसले तरीही तितक्याच आपुलकीने कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेतात अन कार्यकर्तेही त्यांना मित्रासारखे आवर्जून भेटतात अडचणी सांगतात अन कामेही करून घेतात. ते आजही पक्षाचे प्रामाणिक गटबाजी विरहीत काम करतात. त्यामुळेच बनसोडे सर्वांना जवळचे वाटतात यामुळे शरद बनसोडे यांना पुन्हा सोलापूर मतदारसंघातून मिळावे अशी भावना व्यक्त होत आहे.



# जानकरांनी वाढविले टेन्शन प्रवीण माने इंदापूरच्या मैदानात...

**इंदापूर तालुक्यात माजी मंत्री दत्तात्रेय भरणे आणि माजी सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या वादात प्रवीण माने हे आगामी काळात राष्ट्रीय समाज पक्षाचे आमदार होऊ शकतात, असे भाकित पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी तालुक्यातील रुई येथे व्यक्त सांगत टेन्शन वाढविले आहे. तसेच त्यांच्या या विधानामुळे राजकीय जाणकारांसह इंदापूरमधील मतदारांच्या भुवया देखील उंचावल्या आहेत.**

जिल्हा परिषद सभापती राहिलेले माने यांची गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादीच्या अनेक कार्यक्रमाला असलेली गैरहजेरी ठळकपणे जाणवणारी आहे. याशिवाय राष्ट्रवादीतील गटबाजीबाबत भरणे यांनी जाहीर भाषणात वक्तव्य केले होते. त्यानंतर जानकर यांनी माने यांच्या संभाव्य उमेदवारीबाबत जाहीर कार्यक्रमात केलेल्या वक्तव्यानंतर माने हे रासपची वाट धरणार काय? याबाबत तालुक्यात चर्चेला उधाण आले आहे.



राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने इंदापूर तालुक्यातील रुई येथे विविध विकास कामांचे उद्घाटन व शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यक्रमात खुद्द जानकर यांनीच भाष्य केल्याने विद्यमान आमदार भरणे यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

इंदापूर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे भरणे आणि भाजपचे हर्षवर्धन पाटील उमेदवार असतील, ही शक्यता गृहीत धरुन, राष्ट्रवादीचे युवा नेते प्रवीण माने यांना रासपकडून संधी दिली जाऊ शकते, असे सांगत जानकर यांनी जवळपास त्यांची उमेदवारी निश्चित केली आहे. जानकर यांच्या या वक्तव्यामुळे तालुक्यात राजकीय खळबळ उडाली आहे. भरणे व पाटील यांच्यात गेली तीन पंचवार्षिकला लढत होत आहे. या पारंपरिक लढतीत जानकर यांच्या दाव्यामुळे माने यांचे नाव चर्चेत आले आहे.

### गतवेळी मागितली होती उमेदवारी

माने हे जिल्हा परिषदेचे माजी सभापती असून सोनाई उद्योग समूहाचे संचालक आहेत. तसेच, माने हे राष्ट्रवादी काँग्रेसचे समर्थक आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसकडून त्यांनी २०१९ मध्ये उमेदवारी मागितली होती. मात्र, त्यांना थांबण्याचा सल्ला देण्यात आला होता. त्यावेळी माने यांनी पुढील निवडणुकीत उमेदवार राहणार असल्याचे जाहीर केले होते.

# भाजपला अच्छे दिन, राष्ट्रवादी काँग्रेस कोमात

संजय पाटील

महाराष्ट्रात अतिशय वेगवान राजकीय घडामोडी घडल्या. यामध्ये महाविकास आघाडी सरकार सत्तेतून पाय उतार झाले आणि शिंदे गट व भाजप सत्तेत आली. यामुळे अगोदर विकासकामात सुसाटसुटलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अचानक सत्ता बदलामुळे ब्रेक लागला. यामुळे सत्ता बदलाचा परिणाम राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दिसू लागला आहे तर तालुक्यात अगोदर विरोधात आणि आता सत्तेत आलेल्या भाजपला मात्र अच्छे दिन आले आहेत. कारण माढा लोकसभेचा खासदार भाजपचा आहे. माळशिरसचे आमदार रामभाऊ सातपुते व विधानपरिषदेचे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील आहेत. यामुळे तालुक्यातील विकासकामांना गती मिळेल, यात शंकाच नाही. सातपुते यांचा विकासकामांचा तडाखा पाहता आता सत्तेत आल्यानंतर माळशिरस तालुक्यातील जनतेला अजून त्यांच्याकडून मोठ्या अपेक्षा आहेत. कारण सातपुते हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जवळचे मानले जातात. त्यांनी विकासकामांना प्राधान्य देतानाच गोरगरीब जनतेला आरोग्य सेवा देत अनेक गोरगरिबांचे प्राण वाचविले आहेत तर रणजितसिंह मोहिते पाटील हे विकास कामांना प्राधान्य देतात. सत्ता बदलामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये थोडीशी मरगळ आली असून विकासकामांना खीळ बसली आहे. सत्तेत असताना सुसाट सुटलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सत्ता गेल्यामुळे मरगळ आली आहे. यामुळे तालुक्यात भाजपला अच्छे दिन आले आहेत. मात्र तालुक्यात भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गटबाजीचे ग्रहण सोडवावे लागेल.





# आरोग्यमंत्री माढा तालुक्यात आरोग्य क्रांती घडवतील का?

उल्हास पाटील

कुर्डूवाडी शहरात ब्रिटिश काळापासून अद्यावत वैद्यकीय सुविधा उपलब्ध होती. यामुळे परिसरातील पाच तालुक्यातून रुग्ण उपचाराकरिता कुर्डुवाडीमध्ये येत होते. पुण्याप्रमाणे धवलक्रांती, औद्योगिकक्रांती, हरितक्रांती झालेल्या या तालुक्याचा आरोग्य व शैक्षणिक क्रांतीसाठी कोणी विचारच केला नाही. धनवान व राजकीय लोकांच्या इच्छाशक्तिचा अभाव प्रखरपणे जाणवत आहे. आ. बबनदादा शिंदे यांनी धवलक्रांती व हरितक्रांती घडवून आणली पण आरोग्य आणि शैक्षणिक क्रांतीकडे त्यांनी फारसे लक्ष दिले नाही. आ. शिंदे यांना जर सक्षम असा पर्याय निर्माण करायचा झाल्यास राज्याचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांना आरोग्य आणि शैक्षणिक क्रांती घडविण्यासाठी मोठी संधी आहे. ती जर त्यांनी साधली तर माढ्यासाठी आ. सावंत हे सक्षम पर्याय म्हणून समोर येतील.

माढा तालुक्यातील कुर्डूवाडी हे सोलापूर-मुंबई मार्गावरील महत्त्वाचे शहर आहे. ब्रिटिश काळापासून या शहरास तीन जिल्हे व पाच तालुक्यात मध्यवर्ती प्रगत शहर म्हणून स्थान आहे. हे शहर तीर्थक्षेत्र पंढरपूरची नामदेव पायरी तर, मराठवाड्याचे प्रवेशद्वार म्हणून ओळखले जाते. कुर्डूवाडी येथे ट्रामा केअरसाठी माजी आ. नारायण पाटील, आ. बबनदादा शिंदे व आ. संजय शिंदे प्रयत्नशील होते. या तिघांच्या प्रयत्नातून कुर्डूवाडी येथे ट्रामा केअरसाठी निधी मंजूर झाला आणि या ट्रामाकेअरच्या इमारतीचे बांधकाम सध्या प्रगतिपथावर आहे. हे काम लवकरात लवकर पूर्ण होऊन अत्याधुनिक सोयी सुविधा, वैद्यकीय, पॅरामेडिकल स्टाफ येथे उपलब्ध व्हावा, अशी कुर्डूवाडी व परिसरातील नागरिकांची इच्छा आहे.



माढ्यात शैक्षणिक क्रांती होणे गरजेचे आहे. येथे गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. परंतु पदव्युत्तर शिक्षणासाठी माढा तालुक्यात सुविधा नसल्याकारणाने अनेकांना बाहेरचा रस्ता धरावा लागत आहे. माढा तालुक्यातील मुलांना आपल्या गावापासून सुमारे ३० ते ४०० कि. मी दूर जाऊन शिक्षण घ्यावे लागत आहे. तर अनेकांना परिस्थिती अभावी गुणवत्ता असताना शिक्षण अर्ध्यावर सोडावे लागत आहे. त्याच सुविधा जर तालुक्यात उपलब्ध असत्या तर विद्यार्थ्यांची अशी शिक्षणातील परवड झाली नसती. तरी उच्चशिक्षण, अभियांत्रिकी, पॅरामेडिकल, फार्मसी यासारख्या उद्योगाभिमुख शिक्षणाची सोय तालुक्यात होणे गरजेचे आहे.

### भूमिपुत्र लक्ष देतील का?

सावंत हे भूम, उस्मानाबाद, परंडा विधानसभा मतदार संघाचे आमदार आहेत. असे असले तरी ते माढा तालुक्याचे भूमिपुत्र आहेत. खासगी साखरसम्राट आणि शिक्षणसम्राट म्हणून त्यांची संपूर्ण महाराष्ट्राला ओळख आहे. पाच खासगी साखर कारखान्यांसह पुणे जिल्ह्यात जाऊन त्यांनी जयवंत शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करुन इंजिनिअरिंग, फार्मसी अशा विविध महाविद्यालयांचा डोलारा उभा केला आहे. त्यांनी जर माढा तालुक्यात कुर्डूवाडीसारख्या ठिकाणी एखादे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू केले तर निश्चित माढा तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांची पदव्युत्तर शिक्षणासंबंधींची परवड थांबेल. सावंतांनाही मोठा जनाधार या भागातून मिळेल. पर्यायाने आ. सावंताच्या रूपाने माढ्यासाठी पर्याय निर्माण होईल.

## फिलगुड

भाजपची ढाल घेऊन,
शिंदेंचे वार आहेत ।
‘बाळासाहेबांची शिवसेना’वर,
बंडखोर स्वार आहेत ।।

पेटत्या ‘मशालीवर’ ते,
पाणी फेरू शकतात ।
कमळ फुलवण्यासाठी,
चिखल ठरू शकतात ।।

–विजय गायकवाड